दैनिक

# लोकरक्षणाय

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२६७ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, मंगळवार, १२ मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-


## मुंबईकरांच्या सुखकर प्रवासासाठी व प्रदूषण मुक्तीसाठी दक्षिणवाहिनी मार्गिका खुली

■ मुंबई, यश सावंत :

सर्वसामान्य मुंबईकरांचा प्रवास सुखकर होण्याबरोबरच वेळेची आणि इंधनाची बचत करणारे तसेच प्रदूषणमुक्त मुंबई करण्याचे शासनाचे उद्दिष्ट साध्य करणारे प्रकल्प उभारण्यात येत आहेत. इंजिनिअरिंगचा चमत्कार असणारा किनारी रस्ता हा या अनुषंगाने उपयुक्त प्रकल्प असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. प्रियदर्शनी पार्क आणि रेसकोर्सच्या उपलब्ध होणाऱ्या ३०० एकर जागेत आबालवृद्धांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे सेंट्रल पार्क उभारण्यात येणार असून मुंबईकरांसाठी हे ऑक्सिजन पार्क ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सुमारे १४ हजार कोटी रुपये खर्चाच्या १०.५८ कि.मी. लांबीच्या या रस्त्यावर दोन्ही बाजूला प्रत्येकी चार मार्गिका असतील, तर बोगद्यांमध्ये त्या दोन्ही बाजूला प्रत्येकी तीन असतील. उर्वरित काम पूर्ण करण्याच्या अनुषंगाने वरळी ते मरीन ड्राईव्ह या मार्गिकेवर सध्या सकाळी आठ ते रात्री आठ वाजेपर्यंत टोलमुक्त प्रवास करता येणार आहे. मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण) ची वरळी ते मरीन ड्राईव्ह दक्षिणवाहिनी मार्गिका ह्यधर्मवीर, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता (दक्षिण)ह्ळ असे नाव देवून मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे यांच्या हस्ते अंशतः खुली करण्यात आली.

राज्य शासन सर्वसामान्यांना लाभ होणारे प्रकल्प वेगाने पूर्ण करीत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उभारण्यात येत असलेल्या किनारी रस्त्यामधील एका मार्गिकेचा आज शुभारंभ होत असून पुढील टप्पा मे महिन्यापर्यंत सुरू होईल. वेळ आणि इंधनाची बचत करणाऱ्या तसेच प्रदूषणमुक्त मुंबई करण्यामध्ये सहाय्यभूत ठरणाऱ्या या प्रकल्पात सुरक्षिततेची संपूर्ण काळजी घेण्यात आली आहे. उपलब्ध मोकळ्या जागेत हरित क्षेत्र वाढविण्यात येणार आहे. मुंबईचे भूमिपुत्र असलेल्या कोळी बांधवांच्या मागणीनुसार या रस्त्यांच्या खांबांमधील अंतर १२०




मीटरपर्यंत वाढवून त्यांना न्याय दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. हा रस्ता पुढे टप्प्याटप्प्याने दहिसर आणि पालघरपर्यंत वाढविण्यात येणार आहे. गेमचेंजर ठरणारा अटल सेतू, किनारी मार्ग यांसह इतर प्रकल्पांमुळे भविष्यात मुंबईत कोठेही एका तासात पोहोचता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सिद्धिविनायक मंदिर परिसराचा उज्जैनच्या महाकाल मंदिराप्रमाणे विकास करण्यात येईल, यासाठी महापालिकेमार्फत ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचे सांगून मुंबईत विविध यंत्रणांमार्फत सुरू असलेल्या गृह प्रकल्पांमुळे बाहेर गेलेल्या मुंबईकरांना पुन्हा मुंबईत आणण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रकल्पाजवळ उचित ठिकाणी छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

किनारी रस्ता हा मुंबईकरांच्या जीवनात मोठे परिवर्तन घडविणारा प्रकल्प ठरणार असून मुंबईचा सर्वांगीण विकास हेच शासनाचे ध्येय आहे. किनारी रस्ता पुढे वांद्रे-वसोर्वा, वसोर्वा-विरार, विरार-पालघर असा टप्प्याटप्प्याने विस्तारणार असून मुंबई महानगर क्षेत्रात कोठेही एका तासात पोहोचता यावे यासाठी रस्त्यांची एक रिंग तयार करण्यात येणार आहे. मुंबईतील प्रवासादरम्यान वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी मेट्रो, अटल सेतू, जमिनीखालून रस्ते असे प्रकल्प सुरू आहेत. मुंबईची प्रदूषित शहर ही ओळख बदलून वेगवान प्रवासासाठी शासन पावले उचलत आहे. वाहतूक कोंडी कमी करून मुंबईकरांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी हरीत पट्टे तयार करण्यात येत आहेत. त्यादृष्टीने सध्या सुरू असलेले विविध प्रकल्प मुंबईच्या वैभवात भर घालणारे आणि सर्वसामान्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असून भविष्यातील सुखकर प्रवासासाठी मुंबईकरांनी आता होत असलेल्या त्रासात सहनशीलता दाखविल्याबद्दल त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, कौशल्य विकास मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, माजी केंद्रीय राज्यमंत्री मिलिंद देवरा, स्थानिक लोकप्रतिनिधी, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक इकबालसिंह चहल, अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे, डॉ.अश्विनी जोशी आदी यावेळी उपस्थित होते.

## शाळेतच अभ्यास करुन घेण्याचे शिक्षकांना आवाहन, राज्यपाल रमेश बैस यांच मत

■ पुणे, अभिजित येरुल्लू :

'शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गृहपाठ देण्याऐवजी, त्यांचा शाळेतच अभ्यास करून घ्यावा. शाळेच्या माध्यमातून क्षेत्र भेट, ऐतिहासिक स्थळे, गडकिल्ले, नदी, वारसा स्थळे आणि उद्यानांना भेटींचे उपक्रम राबवावे. अशा उपक्रमांमधून त्यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी हातभार लावावा,' असे आवाहन राज्यपाल रमेश बैस यांनी शिक्षकांना केल्या. त्यांच्या या विधानानंतर शिक्षणतज्ज्ञांच्या भुवया उंचावल्या आहेत. राज्यपाल बैस यांनी काही दिवसांपूर्वीच लहान मुलांच्या शाळांची काळची वेळ बदलण्याबाबत सरकारला सल्ला



दिला होता. त्यानंतर आता गृहपाठ न देण्याबाबत शिक्षकांना जाहीर सूचना केल्यामुळे शिक्षणक्षेत्रातून प्रतिक्रिया उमटण्यास सुरुवात झाली आहे.'वेध प्रोफेशनल लर्निंग कम्युनिटी'द्वारे आयोजित शिक्षक संमेलनात बैस बोलत होते. बैस म्हणाले, 'जगातील अनेक देशांत विद्यार्थ्यांना गृहपाठ दिला जात नाही, आपणही हे धोरण स्विकारण्याची गरज आहे. समूहामध्ये विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीचा विस्तार होतो, त्यांच्यात एकत्रितपणे पुढे जाण्याची भावना निर्माण होते. खेळांमध्ये सहभाग वाढल्याने, त्यांच्यात विजय आणि पराभव सहजतेने पचविण्याची क्षमता निर्माण होते.' या वेळी 'मिशन मनरेगा'चे व्यवस्थापक नंदकुमार, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंह देओल, 'वेध'चे समन्वयक नीलेश घुगे उपस्थित होते. रोहिणी पिंपळखेडकर यांच्या 'वेध कृती संकलन' व 'स्पोकन इंग्लिश वेध कृती' या पुस्तिकेचे व केवरा सेन यांच्या 'बेसिक जपानी भाषा' या पुस्तकाचे प्रकाशन राज्यपाल बैस यांच्या हस्ते करण्यात आले.

## मध्य रेल्वे विरोधात रेल्वे प्रवासी संघटनांचे ३१ मार्चला 'भीक मांगो' आंदोलन

■ ठाणे, नितीन देवळेकर :

गेल्याकाही वर्षांपासून कर्जत, कसारा आणि कल्याण मार्गावरील रेल्वे प्रवाशांना प्राथमिक मुलभूत सुविधा मिळत नाही. लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्या आणि मालवाहू रेल्वेगाड्यांमुळे लोकलची वाहतूक रखडत आहे. श्रीमंतांकरिता वंदे भारत सारख्या ट्रेन्स चालविल्या जात आहेत. गेल्या काही वर्षांपासून एकही जादा लोकल फेरी चालविली जात नाही. लांब पल्ल्याच्या गाड्यांमधून अधिक महसूल मिळतो. त्यामुळे त्यांना प्राधान्य दिले जाते असे उत्तर रेल्वे प्रशासनाकडून दिले जात असल्याने कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेतर्फे ३१ मार्चला सर्व रेल्वे स्थानकांत भीक मांगो आंदोलन केले जाणार आहे. यातून जमा होणारा पैसा मध्य रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापकांना देण्यात येणार आहे. कल्याण ते कसारा-कर्जत या मार्गावरील एक -दोन स्थानकांचा अपवाद वगळता सर्वच रेल्वे स्थानके बकाल झाले आहेत. या मार्गावरील आधीच असलेल्या मर्यादित लोकल सेवा दररोज उशिराने रखडत रखडत सुरू असतात. लांब पल्ल्याच्या आणि वंदे भारत गाड्यांना दिले जाणारे प्राधान्य यामुळे हे होते असे प्रवाशांचे म्हणणे आहे. लोकलला होणारी गर्दी आणि असुरक्षित प्रवासातून होणाऱ्या अपघातातही वाढ झाली आहे. या मार्गावरील अपुरे पोलीस मनुष्य बळ, तिकीट तपासणीस आणि सफाई कर्मचारी यामुळे प्रवासातील बोजवरा वाढला आहे. महिला प्रवाशांकरिता स्वच्छतागृहाच्या सुविधा बऱ्याच ठिकाणी नाहीत. फलाट पोकळी ही या



मार्गांवरील अत्यंत मोठी समस्या झाली आहे. ज्यातून अपघात घडत आहेत. जेथे आवश्यक आहे तेथे पादाचारी पुल बांधण्यात आले नाही. त्यामुळे रेल्वे रूळ ओलांडणे अपरिहार्यता बनले आहे. रेल्वे रुळांलगत संरक्षक भिंती नाहीत. स्थानकात आवश्यक पंखे, बाकडे नाहीत आणि ना पिण्याच्या पाण्याची सुविधा नाहीत. या सर्व समस्या या भागातील सर्वसामान्य प्रवाशांना भोगाव्या लागत आहे. रेल्वे प्रशासन हे कायमच निधीची कमतरता असल्याचे सांगितले जाते. आम्ही प्रवासी संघटनेतर्फे रेल्वे प्रशासनाला काही स्थानकात सीआरएस निधीही उपलब्ध करुन दिला आहे. त्यातही बऱ्याच जाचक अटी असल्याने व समन्वय नसल्याने कोणीही खाजगी कंपनी वा फर्म या मदतीला पुढे येण्यास टाळतात. त्यामुळे आम्ही ३१ मार्चला प्रत्येक स्थानकात प्रवाशांकडे भीक मागून जो काही पैसा गोळा होईल तो मा विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना सुपूर्द करू जेणेकरून आमच्या या भागातील काही प्रमुख कामे जी निधी अभावी रखडली आहेत ती मार्गी लागतील असा टिका संघटनेने केली आहे. भीक मागणे हा गुन्हा आहे हे आम्हाला ज्ञात आहे. मात्र याशिवाय आता दुसरा पर्याय शिल्लक नसल्याने आम्ही ही मोहीम हाती घेत आहोत त्यात अडथळा आणू नये ही विनंती. या जमा झालेल्या निधीचा उल्लेख केलेल्या कामाकरिताच वापर व्हावा असे संघटनेचे अध्यक्ष राजेश घणगाव यांनी सांगितले.

**या प्रकल्पांसाठी मागणार भीक**

१) कल्याण ते कसारा तिसरी चौथी मार्गीका आणि कल्याण बदलापूर तिसरी चौथी मार्गीका

२) स्थानकात महिलांकरिता स्वच्छतागृह

३) फलाटाच्या उंचीची कामे

४) पोलीस बळ आणि सफाई कर्मचारी संख्या वाढविणे

५) फलाटावर पंखे बसण्याकरिता बाकडे आणि पिण्याचे पाणी उपलब्ध करणे

६) अत्यावश्यक प्राथमिक वैद्यकीय मदत

## विद्यार्थ्यांचे शुल्क घेणाऱ्या कर्मचाऱ्याने केला ८० लाख रुपयांचा घोटाळा



■ नागपूर, प्रतिनिधी:

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांना राज्यपालांनी नुकतेच निलंबित केले. त्यांच्यावर अनेक गैरव्यवहाराचे आरोप आहेत. त्यानंतर आता विद्यापीठातील काही कर्मचारी पैसे भरण्याच्या खिडकीवर पैशांची अफरातफर करत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे यात आतापर्यंत ८० लाख रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोपही आहे. याबाबत वित्त विभागाकडून दोन कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात येत आहे. मात्र, याबाबत माहिती देण्याबाबत अधिकाऱ्यांकडून कमालीची गोपनीयता बाळगण्यात येत आहे. विद्यापीठामध्ये दररोज विविध प्रकारचे शुल्क भरण्यासाठी विद्यार्थी येतात. विद्यापीठाच्या शुल्क भरण्याच्या खिडकीवर ते शुल्क भरून पावती घेऊन जातात. शुल्क भरल्यावर रोख रकमेसह त्याची पावती विभागात जमा करावी लागते. शुल्कासाठी कॅश काउंटरवरून पावती मिळते. त्यातून नेमकी किती शुल्क भरण्यात आले आहे याची माहिती मिळते. मात्र, विद्यार्थ्यांकडून आलेल्या शुल्काची पावती आणि शुल्क न भरता ही पावती रद्द करून दुसरी पावती तयार करण्यात येत होती. गेल्या काही वर्षांपासून असा प्रकार सुरू असल्याची कुणकूण अधिकाऱ्यांना लागली. शिवाय हिशेबात दिसणारी तफावत यामुळे वित्त अधिकाऱ्यांकडून या प्रकाराची चौकशी करण्यात आली. त्यामध्ये दोन कर्मचाऱ्यांकडून अशाप्रकारे बऱ्याच मोठ्या रकमेच्या पावत्या रद्द करीत नव्या पावत्या तयार करण्यात आल्या असल्याची माहिती समोर आली.

याप्रकरणी दोन कर्मचाऱ्यांची चौकशीही करण्यात आली असून त्यातून जवळपास ८० लाख रुपयांचा अपहार झाला असल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे, विद्यापीठाच्या वित्त विभागामध्ये टी. एम. सॉफ्टवेअर या फर्मच्या माध्यमातून कामे केली जातात. हा अपहार होत असताना त्यांच्याही लक्षात आले नाही.

## कळवा रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराबाहेरपर्यंत रुग्णांच्या रांगा




■ ठाणे, रोहित जैसवाल :

महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात आठवड्याच्या पहिल्याच दिवशी म्हणजेच सोमवारी बाह्य रुग्ण विभागात तपासणीसाठी आलेल्या रुग्णांच्या रांगा रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराबाहेरपर्यंत गेल्याचे चित्र दिसून आले. दररोज बाह्य रुग्ण कक्षात दोन हजारांच्या आसपास रुग्ण येतात. परंतु सोमवारी दोन हजार ८०० रुग्ण तपासणीसाठी आले होते. गेल्या आठवड्यात शुक्रवार आणि रविवार या दोन दिवशी सुट्ट्यांमुळे बाह्य रुग्ण कक्ष बंद ठेवण्यात आल्याने रुग्णांच्या रांगा वाढल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. कळवा येथे महापालिकेचे छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय आहे. या रुग्णालयातील आरोग्य सेवा सुविधा आणि स्वच्छतेविषयी नागरिकांकडून तक्रारी पुढे येत होत्या. त्याची दखल घेऊन ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी रुग्णालयातील ठेकेदार बदलून स्वच्छता व्यवस्थेत बदल केले. त्याचबरोबर रुग्णालयात दर्जेदार आरोग्य सेवा सुविधा कशा मिळतील, यावर त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे. या रुग्णालयात डॉक्टरसह कर्मचाऱ्यांची भरती करण्याबरोबरच रुग्णालयातील खाटांची क्षमता पाचशेवरून एक हजार करण्यासाठी पावले उचलली आहेत. असे असतानाच, दुसरीकडे आठवड्याच्या पहिल्याच दिवशी म्हणजेच सोमवारी बाह्य रुग्ण विभागात तपासणीसाठी आलेल्या रुग्णांच्या रांगा रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराबाहेरपर्यंत गेल्याचे चित्र दिसून आले.

## मुंबई- नवी मुंबई- बदलापूर प्रवास सुसाट; बनणार नवा मार्ग

■ नवी मुंबई, प्रतिनिधी::




मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मुंबई आणि नवी मुंबई मार्गे ठाणे शहर आणि आसपासची वाहतूक कोंडी टाळून थेट बदलापूरला पोहचण्यासाठी नवा वाहतूक नियंत्रित मार्ग उभारण्यासाठी हालचाल करत आहे. त्यासाठी आराखडा तयार केला जात असून शहरातील गर्दी टाळून, कमीत कमी अधिग्रहण आणि मोकळ्या जागेचा वापर करून मार्ग उभारण्याची चाचपणी केली जात आहे. ठाणेपल्याड शहरांचे वेगाने नागरीकरण होते आहे. मुंबई महानगर प्रदेशात ठाणे, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर यासारख्या शहरांपासून काही अंतरावर अनेक राज्यमार्ग, महामार्ग जातात. मात्र या महामार्गामध्ये एक संलग्नता नाही. परिणामी, महामार्गापर्यंत पोहचण्यासाठी मोठा वेळखर्च होतो. तसेच या सर्व शहरांमधून नवी मुंबई, मुंबई या शहरांमध्ये ये-जा करण्यासाठी थेट मार्ग नाही. ही शहरे गाठण्यासाठी सध्या काटई झ्र कर्जत, कल्याण झ्र शिळफाटा, कल्याण - भिवंडीमार्गे ठाणे गाठत पुढचा प्रवास करावा लागतो. त्यामुळे हा प्रवास कमीत कमी वेळेत व्हावा यासाठी स्वतंत्रपणे अभ्यास करत आराखडा तयार करावा.

## पाळलेल्या विदेशी प्राण्यांची नोंदणी आता बंधनकारक, केंद्र सरकारचे नवीन नियम जारी



■ मुंबई, विशाल पाटील :

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने विदेशी पाळीव वन्यजीवांचा ताबा आणि त्यांच्या प्रजननासंबंधीचे नियम अधिसूचित केले आहेत. वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ च्या कलम ४९ एम अंतर्गत हे नियम तयार करण्यात आले आहेत. त्यानुसार ह्यवन्यजीव संरक्षण कायद्या च्या श्रेणी ४ मध्ये सायटीस अंतर्गत संरक्षित विदेशी प्राणी पाळणाऱ्यांना त्यांची नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. वन्यजीव संरक्षण कायद्यामध्ये २०२३ साली सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार सायटीसअंतर्गत प्रथम श्रेणीत संरक्षित करण्यात आलेल्या विदेशी वन्यजीवांचा समावेश कायद्याच्या श्रेणी ४ मध्ये करण्यात आला. संयुक्त राष्ट्राच्या आययूसीएन या परिषदेने १९६३ साली सायटीसची स्थापना केली. वन्यप्राण्यांसह नैसर्गिक संपत्तीची आंतरराष्ट्रीय तस्करीमुळे त्यांच्या अस्तित्वाला धोका उद्‌भवू नये म्हणून खबरदारीच्या उपाययोजना करण्याची जबाबदारी सायटीसकडे सोपविण्यात आली. भारतासह ८० देशांनी १९७३ मध्ये सायटीसचे वन्यजीवांच्या तस्करीसंदर्भात नियम मान्य करून या परिषदेचे सदस्यत्व स्वीकारले. दुर्मिळ विदेशी प्राणी पाळणे चुकीचे आहे. त्यासाठी सायटीसीमध्येही विविध श्रेणी तयार करण्यात आल्या असून त्यातील प्रथम श्रेणीत संकटग्रस्त विदेशी वन्यजीवांचा समावेश करण्यात आला आहे.केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने ह्यलिव्हिंग एनिमल स्पिसीज (रिपोर्टिंग अण्ड रिजिस्ट्रेशन) रुल, २०२४ हा नियम अधिसूचित केला आहे. या नव्या नियमानुसार भारतातील ज्या व्यक्तीने अथवा संस्थेने सायटीसच्या प्रथम श्रेणीत संरक्षित असलेले विदेशी प्राणी पाळले असतील, तर त्यांची नोंदणी करणे अनिवार्य आहे. २८ फेब्रुवारी, २०२४ पासून पुढील ६ महिन्यांमध्ये नोंदणी करणे अनिवार्य आहे. परिवेश २.० पोर्टलद्वारे ही नोंदणी करता येतील. त्यानंतर पुढील ३० दिवसांच्या आत परिवेश पोर्टलच्या माध्यमातूनच संबंधित राज्याच्या प्रधान मुख्य वनसंरक्षकांनाही माहिती देणे बंधनकारक आहे. तसेच या विदेशी वन्यजीवांचे हस्तांतरण, त्यांना पिल्ले झाल्यास अथवा मृत्यू झाल्यास, त्याचीही नोंद परिवेश पोर्टलमध्ये करणे अनिवार्य आहे. या नव्या नियामामुळे विदेशी प्राण्यांचे हस्तांतरण आणि जन्म-मृत्यू यांची नोंद ठेवता येणार आहे.

## महिलेचा प्रामाणिकपणा, दोन लाखांचा ऐवज केला परत

■ पालघर, सचिन कदम :

खोडाळा येथे रहिवासी शैला समाधान खाडगीर यांना प्रवासा दरम्यान, कसारा लोकल मध्ये एक लेडीज पर्स सापडली होती. सदर महिलेने ही पर्स खोडाळा पोलीस ठाण्यात प्रामाणिकपणे पोलिस कर्मचाऱ्यांच्या हवाली केली आहे. या पर्स मध्ये सोने, चांदीच्या वस्तु, रोख रक्कम व मोबाईल होता. खोडाळा पोलीसांनी मोबाईल वर आलेल्या कॉलवरुन तपास काढून, शहापूर तालुक्यातील वाशिंद येथील मुळ मुद्दे माल मालक असलेल्या रोहिणी सुरज सिंग यांना पोलीस ठाण्यात बोलावले. तसेच खातरजमा करुन सदर मुद्देमाल रोहिणी सिंग यांच्या हवाली केला आहे. शैला खाडगीर यांच्या या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. याबाबत खोडाळा यांच्या कडून यांच्या माहितीनुसार, शैला समाधान खाडगीर या महिलेला रेल्वे प्रवासा दरम्यान कसारा येथे एक लेडीज पर्स सापडली होती. सदर पर्समध्ये सोन्याचे मंगळसूत्र - ३ तोळे, चांदीचे पैंजण १ जोडी , जोडवी चांदीच २ नग , लॉकेट सोन्याचे ०१ ग्राम, रोख रक्कम रुपये ४ हजार , रेडमि कंपनीचा मोबाईल फोन १ असा अंदाजे २ ते सव्वादोन लाखांचा ऐवज मिळून




आला आहे. सोन्याचे दागिने आणि रोकड पाहून सदर महिला भयभीत झाली होती.मात्र प्रामाणिकपणा आणि भिती यामूळे सदरचा ऐवज शैलाने खोडाळा पोलिसांच्या हवाली करुन ती भितीपोटी निघून गेली होती. दरम्यान पोलीस हवालदार संजय बागुल व पोलिस अंमलदार श्रीरंग शेळके यांनी खातरजमा करुन पर्समध्ये असलेल्या मोबाईल वर आलेल्या कॉल वरुन शहापूर ( ठाणे ) तालुक्यातील वाशिंद येथील रोहिणी सुरज सिंग यांची असल्याचे समजले. त्यांच्याशी संपर्क करून त्यांना पोलीस दुरक्षेत्र खोडाळा येथे बोलावून त्यांच्या ताब्यात मुद्दे मालासहित पर्स दिली असल्याचे खोडाळा पोलिसांनी सांगितले आहे. मोखाडा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रदीप गिते यांच्याशी संपर्क साधला असता, श्रीमती शैला समाधान खाडगीर या महिलेच्या प्रामाणिकपणाचे तोंड भरून कौतुक केले आहे.

## गोखले–बफीर्वाला पूल जोडण्यासाठी उपाय सुचवा, पालिका आयुक्तांचे 'व्हीजेटीआय'ला साकडे

■ मुंबई, विशाल कारंडे :

अंधेरीतील गोखले पुलाची उंची वाढल्याने झालेला घोळ निस्तरण्यासाठी मुंबई महापालिकेने व्हीजेटीआयला साकडे घातले आहे. गोखले पूल, बफीर्वाला पूल जोडण्यासाठी आवश्यक ते उपाय सुचविण्यासाठी सर्वेक्षण करावे, अशी विनंती पालिकेने संस्थेला पत्र लिहून केली आहे. जानेवारीत गोखले पुलाची एक मार्गिका वाहतुकीसाठी खुली केली. हा पूल बफीर्वाला पुलाला जोडणे अपेक्षित होते. त्यामुळे एस. व्ही. रोडवरील वाहतूककोंडी टाळून पश्चिम द्रुतगती महामार्गावर प्रवेश करणे सुलभ होणार होते. मात्र, पुलाची मार्गिका सुरू झाल्यानंतर पुलाची उंची काही मीटरने वाढल्याचे स्पष्ट झाले. या पुलावरून बफीर्वाला पुलावर जाणे अशक्य बनले आहे. साहजिकच मार्गिका सुरू होऊनही वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. ही कोंडी फोडण्यासाठी बफीर्वाला पूल तोडून तो नव्याने बांधण्याचा पर्याय होता. त्यासाठी १०० कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. हा पर्याय अव्यवहार्य असल्याने पालिकेने अन्य पयार्यांची चाचपणी सुरू केली



आहे. त्यासाठी व्हीजेटीआयची मदत घेतली जाणार आहे. हे दोन्ही पूल एकत्रित करण्यासाठी जे काही उपाय असतील ते सुचवा, त्यादृष्टीने सर्वेक्षण करा, बफीर्वाला पूल न तोडता काय तोडगा काढता येईल, हे सुचवा, अशी विनंती आयुक्तांनी संस्थेला केली आहे.

## पाकिस्तानातील महिलेला गोपनीय माहिती पुरवणाऱ्याला अटक

■ मुंबई, प्रतिनिधी:

महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) प्रतिबंधित क्षेत्रातील संवेदनशील माहिती पाकिस्तानी गुप्तचरांना पुरविल्याच्या आरोपावरून माझगाव गोदीतील एका ३१ वर्षीय स्ट्रक्चरल फॅब्रिकेटरला अटक केली. हा हनी ट्रॅपचा प्रकार असून याप्रकरणी एटीएसने आरोपी आणि त्याच्या संपर्कात असलेल्या इतरांविरुद्ध अधिकृत गुप्तता कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अनेक महिन्यांपासून समाज




माध्यमावर एका महिलेशी चॅटिंग करीत होता. महिलेच्या सूचनेनुसार तो तिला माहिती देत असल्याचा आरोप आहे. देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील ठिकाणी काम करणारा आरोपी पैशांच्या बदल्यात आरोपी महिलेला समाज माध्यमावर गोपनीय माहिती पुरवित होता असा आरोप आहे. आरोपी महिला पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणांशी संबंधित असल्याचा संशय आहे. हनी ट्रॅपमध्ये अडकवून ती त्याच्याकडून संवेदनशील माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करीत होती, असा दावा एटीएसच्या सूत्रांनी केला आहे. यापूर्वीही डिसेंबरमध्ये, महाराष्ट्र एटीएसने मुंबईतील माझगाव गोदीत काम करणाऱ्या २३ वर्षीय गौरव पाटीलला पाकिस्तानस्थित इंटेलिजन्स ऑपरेटिव्हच्या (पीआयओ) एजंटसोबत गोपनीय माहिती सामायिक केल्याप्रकरणी अटक केली होती.

दैनिक लोकरक्षणाय www.lokrakshanay.com
ठाणे, मंगळवार, १२ मार्च २०२४

//सुविचार
' विश्वास आणि आशीर्वाद डोळ्यांनी दिसत नाही
मात्र अशक्य गोष्टीलाही शक्य करतात. //



# हराभरा कबाब

**साहित्य :** २ मोठे कप भरून मटारचे दाणे, १ मोठा उकडलेला बटाटा, ब्रेड क्रम्बस, आमचूर पावडर, मीठ व थोडीशी साखर, २ ते ३ हिरव्या मिरच्या, आले व लसूण.


**कृती :** सगळ्यात पहिले कढईमध्ये तेल घेऊन त्यात मटारचे दाणे टाकले. त्यामध्ये थोडी हळद, मीठ, हिरवी मिरची, आले, लसूण, जिरे जाडसर वाटलेले टाकले. १० ते १५ सेकंद वाफवले. नंतर त्यात आमचूर पावडर आणि साखर टाकले व २ मिनिटे परतून घेतले. त्यानंतर हे मिश्रण थोडे थंड झाल्यावर मिक्सरमध्ये जाडसर भरड काढली. मटारच्या जाडसर भरडमध्ये कुस्करलेला बटाटा ब्रेड क्रम्बस व तोडे चवीपुरते मीठ टाकले. मिश्रण एकत्र केल्यावर गोल टिक्की बनवून तळून घेतले.



# सोन्याने सजवा रेशमी केस



**फॅशनच्या** युगात भूतकाळातल्या गोष्टी आल्या तर त्यात काही नवल नाही. कारण राजा-महाराजांच्या काळात मोठ्या कलाकुसरतेने तयार करण्यात आलेले पेहराव, नक्षीदार दागिने आजच्या आधुनिक युगातील कारागिरांना आकर्षित करत असून, त्यात काही बदल करून एक वेगळी नक्षी तयार केली जाते व तीच बाजारात पुन्हा फॅशनच्या रूपाने येते. त्यापेक्षा वेगळी गोष्ट म्हणजे राजा-महाराजांच्या काळात सोन्याच्या मुलाम्याने केस सजवले जात होते. त्याच नक्षीकडे आजचे कारागीर आकर्षित झालेले दिसतात. फॅशन म्हणजे जुन्या नव्याचे मिश्रणच म्हणता येईल. काळानुसार फॅशनमध्ये बदल झाले आहेत. मात्र त्याच्यामागे भूतकाळ लपला आहे. नव्याने बाजारात असलेल्या हेअर ज्वेलरीवर त्याचा प्रभाव दिसतो.



देवदास, जोधा अकबर, हम दिल दे चुके सनम, उमराव जान असे काही चित्रपट आहेत, की त्यात नायिकेच्या केसांवर अधिक भर दिलेला दिसतो. भारतीय मुघल साम्राज्यातील शैली त्यात वापरलेली दिसते. या दागिन्यांना सामान्य नागरिकांनी देखील पसंती दर्शवली आहे. घागरा, साडी, सलवार-कुर्ता किंवा शर्ट पॅण्टवर देखील हे दागिने परिधान केले जाऊ शकतात. या दागिन्यांमध्ये हिरे, मोती, माणिक यांचे वर्क केले जात असल्याने त्यांच्या वजनानुसार त्यांची किंमत ठरवली जाते. रेश्मी केसांकरिता तयार करण्यात येणारे दागिने शुद्ध सोन्यात केले जातात. मात्र कमी बजेटमध्ये चांदीच्या दागिन्यांवर सोन्याची पॉलिश करून ते खरेदी करता येऊ शकतात.





# आल्याचा ज्यूस आरोग्यासाठी फायदेशीर

- आल्याच्या रसामुळे डायबेटिज कंट्रोल होण्यास मदत होते. यातील अँटी डायबेटिक गुणधर्मामुळे डायबेटिज नियंत्रित राहतो.
- पचनाचा त्रास असल्यास त्यावर आल्याचा रस उत्तम. आल्याच्या रसाने पचन नीट होते.
- कोलेस्ट्रॉल लेव्हल कमी होण्यासाठी आल्याचा रस घेणे फायदेशीर.
- आल्याच्या रसाच्या सेवनाने मुरुमे कमी होतात.
- कफाचा त्रास असल्यास त्यावरही आल्याचा रस उत्तम. पावसात सर्दी-खोकल्याचा त्रास अधिक होतो. त्यामुळे पावसात आल्याचा रस नियमितपणे घेतल्यास सर्दी-खोकल्यापासून बचाव होऊ शकतो.



# उन्हाळ्यात एसी चालवण्याआधी हे काम न केल्यास विजेचे बिल येईल भरमसाट

उन्हाळा सुरू झाला आहे. अनेक घरांत २४ तास पंखे सुरू ठेवावे लागत आहेत. तुमच्या घरात जर एसी असेल तर तो चालवण्याआधी काही गोष्टी जाणून घ्या. आज आम्ही तुम्हाला या ठिकाणी काही खास टिप्स देत आहोत. ज्या तुमच्या वीज बचत करण्यास मदत करू शकतात. तुम्ही जर या टिप्सचा वापर न करता एसी चालवत असाल तर तुमचे वीज बिल जास्त येण्याची शक्यता आहे. नेहमी लोक गरमीत एसी ऑन करतात. परंतु असे करणे चुकीचे आहे. गरमीत एसी सुरू करण्याआधी काही गोष्टी जाणून घेणे खूप गरजेचे आहे. जाणून घ्या डिटेल्स.

**घरात एसी असणारे**
अनेक लोक असे आहेत. जे वर्षभर एसी चालवत नाहीत. परंतु उन्हाळा सुरू झाला की, घरातील एसी अचानक सुरू करतात. परंतु त्याआधी काही गोष्टी जाणून घेत नाही. त्यामुळे महिन्याचे बिल जास्त येते.



**एसी सर्व्हिस करणे आवश्यक**

काही महिन्यापासून बंद पडलेला एसी अचानक तुम्ही जर उन्हाळ्यात सुरू करीत असाल तर काही गोष्टी जाणून घ्यायला हव्यात. एसीला सुरू करण्याआधी त्या एसीची सर्व्हिस करणे खूप आवश्यक आहे. असे केल्याने केवळ गरमीत थंड हवा मिळत नाही तर वेळोवेळी सर्व्हिसिंग केल्याने तुमच्या एसीची लाइफसुद्धा वाढते. जर तुम्ही विना सर्व्हिस एसी सुरू ठेवत असाल तर तुमची खोली एसीने थंड होईल, पण महिन्याला विजेचे बिल भरमसाट येऊ शकते.

**एसी गॅस संबंधी हे काम करणे आवश्यक**

जितकी आवश्यक एसी सर्व्हिस आहे. तितकेच आवश्यक एअर कंडिशनरमधील गॅस चेक करणे आहे. उन्हाळा सुरू होण्याआधी विनागॅस चेक करता एसी सुरू केला तर होऊ शकते की, तासभर एसी चालवल्यानंतर तुम्हाला थंड एसी मिळणार नाही. कूलिंग कमी होऊ शकते. कारण कम्प्रेसरवर दबाव वाढतो. यामुळे तुमचा एसी खराब होऊ शकतो. तुम्हाला हा एसी दुरुस्त करण्यासाठी मोठी रक्कमसुद्धा मोजावी लागू शकते.

**पालकांमध्ये आपल्या मुलांना स्वीमिंग शिकवण्याची क्रेझ काही वर्षांपासून अनेक पटीने वाढली आहे. काही पालक आपल्या मुलांना स्वीमिंग शिकवण्याच्या बहाण्याने स्वत:ही स्वीमिंग शिकतात. अनेक तज्ज्ञ स्वीमिंगला एका खेळाव्यतिरिक्त व्यायामाचा एक उत्तम पर्याय मानतात. परंतु स्वीमिंग योग्यप्रकारे न केल्यास आरोग्यासाठी नुकसानकारकही ठरू शकते. इंद्रप्रस्थ अपोलो रुग्णालयाचे डिपार्टमेंट ऑफ इंटरनल मेडिसिन सीनियर कन्सलटेंट डॉ. राकेश गुप्ता यांनी याबाबत काही टिप्स दिल्या आहेत.**

# सावधान! मुलांना स्वीमिंग शिकवण्याआधी घ्या ही काळजी

**आरोग्य तपासणी**

मुलांना स्वीमिंगच्या क्लासला पाठवण्याआधी डॉक्टरांकडून मुलाची तपासणी करून घ्या. त्वचेचे संक्रमण, डोळे, नाक, कान, घशाची तपासणी करून घ्या. स्वीमिंग पूलच्या पाण्यात क्लोरिनचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे सर्व इंद्रियांची योग्य ती काळजी घेणे गरजेचे असते.

जर मुलाचे वजन अधिक जास्त किंवा अधिक कमी असल्यास अशा मुलांना डॉक्टरांकडून काही सल्ले देण्यात येतात. त्यामुळे मुलांना स्वीमिंगला टाकण्याआधी डॉक्टरांचा जरूर सल्ला घ्या.

**स्वीमिंग पूलची स्वच्छता**

स्वीमिंग पूलच्या स्वच्छतेवर लक्ष देणे गरजेचे असते. दररोज पूलमध्ये अनेक लोक येत असतात. अशावेळी एखाद्याला त्वचारोग किंवा अन्य काही रोग असल्याचा त्याचा आपल्या मुलालाही धोका होऊ शकतो. त्यामुळे रोज स्वीमिंग पूलचे पाणी बदलले जाते का, स्वच्छ केले जाते का याची चौकशी करा. अनेकदा स्वीमिंग पूल खुल्या जागी असतात. त्यावर छप्पर नसल्यास स्वीमिंग पूलमध्ये पडणाऱ्या धूळ, पावसाचे पाणी तसेच इतर कचऱ्यामुळे संक्रमण होण्याचा धोका असतो.

**लाईफगार्ड**

सर्व स्वीमिंग पूलमध्ये लाईफगार्ड असणे गरजेचे आहे. काही वेळा एखाद्या साधारण पोहणाऱ्या व्यक्तीला लाईफगार्ड म्हणून उभे केले जाते. अशा व्यक्तीकडे आपत्कालीन परिस्थितीत वाचवण्यासाठी कोणतेही प्रशिक्षण नसते. ज्यावेळी स्वीमिंगसाठी येणाऱ्यांची संख्या अधिक असते, त्यावेळी अधिक लाईफगार्ड असणे गरजेचे आहे.

**प्रथमोपचार सुविधा**

सरकारी नियमांनुसार जलतरण तलावात प्रथमोपचार सुविधा आणि इतर सर्व प्राथमिक सुविधा असाव्या. या सुविधा स्वीमिंग पूलच्या जवळ असाव्यात. आपत्कालीन परिस्थितीत व्यक्तीला प्रथम प्राथमिक मदत कक्षात नेणे आवश्यक आहे आणि आवश्यकतेनुसार प्राथमिक मदत दिली गेली पाहिजे.

**प्रशिक्षण आणि प्रशिक्षक**

पाण्यात उडी मारण्याआधी मुलांना अनुभवी कोचद्वारे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. मुलांना पोहण्याचे शिकवण्यावेळी सुरक्षा उपकरणांचा वापर होणे गरजेचे आहे. ग्लासेस, फ्लोटर्स, इयर प्लग, कॅप इत्यादींचा वापर करणे गरजेचे आहे. फ्लोटरमध्ये छोटासाही होल असल्यास त्याची वेळीच दुरुस्ती केली गेली पाहिजे. फ्लोटर्स योग्य नसल्यास पाण्यात मुलांचे संतुलन बिघडण्याचा धोका असतो.

**डिहायड्रेशन**

पाण्यात पोहत असतानाही शरीरात डिहायड्रेशन होत असते. जास्त घाम येतो. त्यामुळे पाणी सोबत ठेवणे गरजेचे आहे.



# वजन कमी झाल्याने सेटवरुन दिव्या दत्ताला पाठवलेलं घरी; अभिनेत्रीने सांगितला 'तो' अनुभव

बॉलिवूड किंवा एकंदरच चित्रपटसृष्टीत अभिनयापेक्षा शारीरिक सौंदयार्ला महत्त्व दिलं जातं हे सत्य आहे. आज कित्येक अभिनेत्री या आघाडीवर असल्या तरी प्रत्येक अभिनेत्रीला या गोष्टीचा सामना कधी ना कधीतरी करावा लागलाच आहे. मग काही अभिनेत्री सर्जरीसारखे पर्याय निवडतात आणि शरीरात हवे तसे बदल करून घेतात, तर काही अभिनेत्री या केवळ अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवतात. अशाच काही अभिनेत्रींपैकी एक अभिनेत्री म्हणजे दिव्या दत्ता. सदैव आपल्या वेगळ्या भूमिकांमधून प्रेक्षकांच्या मनावर छाप पाडणाऱ्या दिव्या दत्ताच्या अभिनयाचं प्रचंड कौतुक होतं. नुकतंच दिव्याने दी लल्लनटॉपच्या गेस्ट इन द न्यूजरूम या कार्यक्रमात हजेरी लावली अन् मोनमोकळ्या गप्पा मारल्या. या मुलाखतीदरम्यान चित्रपटक्षेत्रात काम करताना आलेल्या अनुभवांबद्दल तसेच मिळालेल्या नकारांबद्दल भाष्य केलं आहे. या मुलाखतीमध्ये दिव्याने तिला तिच्या वजनावरूनही बोलणाऱ्या लोकांबद्दल भाष्य केलं. याविषयी बोलताना दिव्या म्हणाली, या इंडस्ट्रीमध्ये राहताना, वावरताना मी हळूहळू नकार पचवायला शिकले, शिवाय चित्रपटातून काढून टाकलं जाणं याचं दुःखदेखील मी हळूहळू पचवू लागले. आयुष्य तुम्हाला या सगळ्या गोष्टी पचवायला शिकवते. माझ्याकडे जेव्हा काही काम नव्हते तेव्हा मी काम मागण्यासाठी निर्मात्यांचे उंबरे झिजवायचे, पण त्यांच्या टिपिकल हिरॉईनच्या साच्यात मी कधीच फिट बसणार नव्हते याची जाणीव मला झाली नव्हती. एकेदिवशी मी तब्बल २२ चित्रपट साईन केले, काही चित्रपटांचे मला टोकनही मिळाले, तेव्हा मला कुणीच नाही म्हंटलं नाही, पण नंतर माझ्या ध्यानात आलं की त्या २२ पैकी केवळ दोनच चित्रपट हे पुढे गेले ज्यात मी नायिका म्हणून नव्हते. पुढे दिव्या म्हणाली, अशाप्रकारे मला बऱ्याच चित्रपटातून बाजूला काढलं गेलं. एकेदिवशी तर मी एका चित्रपटाच्या सेटवर गेले तेव्हा माझं वजन कमी झाल्याने मला यातून काढण्यात आल्याचं सांगण्यात आलं. त्यावेळी माणुसकीवरुन माझा



# दै. लोकरक्षणाय सुडोकू - २९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | | 3 | | 2 | 4 | 8 | | 5 |
| | | | | | | 1 | 4 | |
| 1 | 8 | | 9 | | 6 | 2 | | |
| 8 | | 7 | | 4 | | | 5 | |
| 9 | 3 | | | | | | | 2 |
| 5 | | | 3 | | 1 | 7 | | 8 |
| | | 1 | | | 3 | | | 4 |
| | | | | 7 | | 6 | | |
| | | 8 | 5 | | 2 | | 7 | |


## उत्तर सुडोकू -२८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 4 | 6 | 7 | 5 | 8 | 3 | 1 | 9 |
| 3 | 5 | 8 | 6 | 9 | 1 | 4 | 7 | 2 |
| 7 | 9 | 1 | 2 | 3 | 4 | 6 | 5 | 8 |
| 4 | 8 | 9 | 1 | 2 | 3 | 7 | 6 | 5 |
| 5 | 6 | 2 | 4 | 7 | 9 | 8 | 3 | 1 |
| 1 | 3 | 7 | 5 | 8 | 6 | 2 | 9 | 4 |
| 6 | 7 | 4 | 8 | 1 | 5 | 9 | 2 | 3 |
| 8 | 1 | 3 | 9 | 6 | 2 | 5 | 4 | 7 |
| 9 | 2 | 5 | 3 | 4 | 7 | 1 | 8 | 6 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# नाच गं घुमा नंतर स्वप्नील जोशीने केली नव्या चित्रपटाची घोषणा!

नाच गं घुमा या चित्रपटाच्या माध्यमातून निर्मिती विश्वात पदार्पण केल्यानंतर आता महाराष्ट्राचा लाडका अभिनेता स्वप्नील जोशी नव्या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर येणार आहे. हा चित्रपट येत्या जून महिन्यात प्रदर्शित होणार आहे. अभिनेता स्वप्नील जोशीसाठी २०२४ हे वर्ष खूपच खास ठरणार आहे कारण, यंदा त्याचे अनेक नाविन्यपूर्ण चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. निर्मिती, अभिनय आणि आणखी काही विविधांगी भूमिकांमधून स्वप्नील येणाऱ्या वर्षात प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी सज्ज होत आहे. नवरा माझा नवसाचा २, नाच गं घुमा या चित्रपटानंतर अभिनेत्याने आता नव्या चित्रपटाची घोषणा केली आहे. या सिनेमाचं नाव बाई गं असून येत्या १४ जून २०२४ रोजी हा चित्रपट प्रदर्शित होईल. बाई गंमध्ये स्वप्नीलबरोबर मुख्य भूमिका कोण साकारणार हे अद्याप समोर आलेलं नाही. याबद्दल अभिनेता म्हणतो, नाच गं घुमा नंतर मी लगेच बाई गं सारखा चित्रपट करणं ही माझ्यासाठी खूप आनंदाची गोष्ट आहे. लवकरच या चित्रपटात माझी भूमिका काय आहे हे सर्वांसमोर स्पष्ट होईल. २०२४ मध्ये मी खूप काम करतोय आणि तुमचं न थांबता मनोरंजन करता येतंय या सारखं वेगळं सुख काय असणार ना! बाई गं मध्ये नक्कीच काहीतरी खास असणार आहे परंतु यासाठी प्रेक्षकांना थोडी वाट बघावी लागणार आहे. लवकरच या चित्रपटाबद्दल पुढच्या अपडेट्स आम्ही शेअर करू. दरम्यान, परेश मोकाशी दिग्दर्शित नाच गं घुमा चित्रपट येत्या मे महिन्यात प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.



# दिनविशेष

## १२ मार्च

- १८९४: कोका-कोला बाटली मध्ये भरून विक्रीस सुरवात.
- १९११: कृष्णाजी प्र. खाडिलकरांच्या संगीत मानापमानाचा पहिला प्रयोग झाला.
- १९१८: रशियाची राजधानी सेंट पीट्सबर्ग येथून मास्को येथे हलविण्यात आली.
- १९३०: महात्मा गांधी यांनी मिठाच्या सत्याग्रहासाठी २०० मैलाच्या दांडीयात्रेला सुरवात केली.
- १९६८: मॉरिशस इंग्लंडपासून स्वतंत्र झाला.
- १९९१: जेजुरी येथील खंडोबा मंदिरात चोरी.
- १९९२: स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २४ वर्षांनी ब्रिटिश सत्तेची सर्व जोखडे झुगारुन देऊन मॉरिशस प्रजासत्ताक बनले.
- १९९३: मुंबई येथे १२ बॉम्बस्फोटांच्या मालिकेत ३०० हून अधिक जण ठार झाले, तर हजारो जखमी झाले.
- १९९९: सरकारी नोटांवर यापुढे महात्मा गांधींचेच चित्र असेल असा सरकारतर्फे निर्णय घेण्यात आला.
- १९९९: चेक प्रजासत्ताक, हंगेरी व पोलंड नाटो (ठअळड) मधे सामील झाले.
- २००१: ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी आणि पर्यावरणवादी नेते सुंदरलाल बहुगुणा यांना यशवंतराव चव्हाण स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- १८२४: जर्मन भौतिकशास्त्रज्ञ गुस्ताव किरचॉफ यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर १८८७)
- १८९१: अभिनेते आणि निमार्ते नटवर्य चिंतामणराव कोल्हटकर यांचा जन्म.
- १९११: गोव्याचे पहिले मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर यांचा जन्म. (जन्म: १२ ऑगस्ट १९७३)
- १९१३: भारताचे ५वे उपपंतप्रधान, संरक्षणमंत्री आणि महाराष्ट्राचे पहिले मुखमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा जन्म. (मृत्यू: २५ नोव्हेंबर १९८४)
- १९३३: लेखिका कविता विश्वनाथ नरवणे यांचा जन्म.
- १९३१: साउथवेस्ट एअरलाईन्स चे सहसंस्थापक हर्ब केलेहर यांचा जन्म.
- १९८४: प्रसिध्द पार्श्वगायिका श्रेया घोशाल यांचा जन्म.
- १९४२: जर्मन अभियंते आणि उद्योजक रॉबर्ट बॉश यांचे निधन. (जन्म: २३ सप्टेंबर १८६१)

# भविष्य

**मेष** – वागण्या-बोलण्यात काहीसा हटवादीपणा येईल. कामात गतीमानता येईल. स्वतःबद्दलच्या नसत्या कल्पना बाजूला साराव्यात.

**वृषभ** – वागण्यात कर्मठपणा आणाल. वडीलांचा मान ठेवून निर्णय घ्यावा. प्रगल्भतेने वागणे ठेवाल. न्यायी वृत्तीने मत मांडाल.

**मिथुन** – प्रतिकूलतेतून मार्ग काढावा. आरोग्याची काळजी घ्यावी. अति विचार करू नका. अचानक धनलाभ संभवतो. मनातील आकांक्षा पूर्ण होईल.

**कर्क** – शांत व संयमी विचार कराल. वैचारिक आधुनिकता ठेवावी. जोडीदाराचे मत विचारात घ्यावे. भावंडांना मदत कराल. घराची सजावट कराल.

**सिंह** – चुकीच्या लोकांमुळे मनःस्ताप होण्याची शक्यता आहे. परिस्थिती जाणून योग्य मार्ग काढावा. सर्दी, खोकला यांसारखे त्रास संभवतात. वाताचे विकार बळवू शकतात.

**कन्या** – मनातील नसते संशय काढून टाकावेत. अत्यंत व्यवहारी दृष्टीकोन ठेवाल. आपल्या बुद्धिमत्तेचा सदुपयोग करावा. दीर्घकाळ चिकाटीने कामे कराल. जोडीदाराची प्राप्ती वाढेल.

**तुला** – घरगुती कामात अधिक कष्ट पडू शकतात. आपल्या गृहसौख्याकडे अधिक लक्ष द्यावे. हातातील कामात यश येईल. नातेवाईकांना मदत करावी लागेल. प्रवासात वाहन जपून चालवावे.

**वृश्चिक** – काही गोष्टींचा अधिक खोलवर विचार करावा. धैयानें कामे हाती घ्याल. व्यवसायात चांगली आर्थिक कमाई होईल. हातात काही नवीन अधिकार येतील. कौटुंबिक खर्चाचा ताण

**धनु** – काही बदल जाणीवपूर्वक करावेत. नसत्या वादात अडकू नका. निराशेच्या आहारी जाऊ नये. घराची कामे सुरळीत पार पडतील. स्वबळावर कामे उरकाल.

**मकर** – जुन्या गोष्टींचा आधार घेणे टाळावे. सकारात्मक दृष्टीकोन ठेवावा. कामातील अडथळे प्रयत्नाने दूर करावे लागतील. छुप्या शत्रूंची डोकेदुखी वाढेल. हातातील अधिकार वापरावेत.

**कुंभ** – उगाचच कोणाशीही वैर पत्करू नका. काही कारणाने घरापासून दिवसभर दूर राहावे लागेल. गप्पांची मैफल जमवाल. तुमच्या बोलण्याचा चांगला प्रभाव पडेल. कौटुंबिक खर्च आटोक्यात ठेवावा.

**मीन** – कामाचा योग्य आढावा घ्यावा. मानसिक ताण जाणवेल. कामातील दिरंगाई टाळण्याचा प्रयत्न करावा. मानापमान फार मनावर घेऊ नका. आपले स्वत्व गुण राखून वागाल.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

संपादकीय

# विश्वास कधी फळाला येणार!

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षाच्या अठराव्या वर्धापन दिनी नाशिक येथे मेळावा घेऊन सगळ्या राजकीय पक्षांची पोलखोल केली. आतून सगळे एकच आहेत, तुम्हाला वेडे बनवले जात आहे. त्यांचे राजकारण सुरू आहे, असे अगदी लोकांना पटणारे विचार त्यांनी मांडले. राज ठाकरे यांनी पक्षाची स्थापना करून आता १८ वर्षे झाली आहेत. राज यांच्या सभांना प्रचंड गर्दी जमते. इतकेच काय तर राज यांचे भाषण सुरू झाले की, सगळ्या इलेक्ट्रॉनिक वृत्तवाहिन्या इतर कार्यक्रम आणि इतर नेत्यांची भाषणे बाजूला ठेवून राज यांचेच भाषण दाखवतात. इतका राज यांचा जबरदस्त टीआरपी आहे. इतकी लोकप्रियता असूनही त्यांच्या पक्षाला राज्यात सत्ता का मिळत नाही, यावरून अनेक राजकीय विश्लेषक संभ्रमात आहेत. कारण एका बाजूला नेत्यांच्या सभांना गर्दी जमवण्यासाठी त्यांना बऱ्याच उठाठेवी कराव्या लागतात, तर राज यांच्या सभेला लोक स्वतःहून मोठी गर्दी करतात. राज यांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला महाराष्ट्रात सुरुवातीला मोठे यश मिळाले. राज यांनी पक्षस्थापनेपासून एकला चलोची भूमिका घेतलेली आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या जनतेला नेहमी सांगितलेले आहे की, महाराष्ट्राची सत्ता माझ्या हातात द्या, मी तुम्हाला राज्याचा कायापालट करून दाखवतो. पण महाराष्ट्रासारख्या राज्याची एक हाती सत्ता मिळवणे वाटते तितके सोपे नाही. कारण ते शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांनाही जमले नाही. सत्तेत येण्यासाठी त्यांनाही युती किंवा आघाडी करावी लागली.एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल की, महाराष्ट्राची राजकीय परिस्थिती वेगळी आहे. जेव्हा काही वर्षांपूर्वी काँग्रेस हा इथला प्रमुख पक्ष होता, तेव्हा त्यांची बहुमताची सत्ता राज्यात येत असे. पण त्यांच्यातही गटबाजी असायची. एकमेकांची सरकारे पाडली जायची. पण जेव्हा महाराष्ट्रात शिवसेनेचा, भाजपचा विस्तार होऊ लागला, तसेच पुढे काँग्रेसमधून बाहेर पडून शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली तेव्हा परिस्थिती बदलली. इतकेच काय, पण राज ठाकरे जेव्हा शिवसेनेतून बाहेर पडले तेव्हा शिवसेना कमजोर झाली. राज हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे सर्वार्थाने प्रतिरूप वाटत असल्यामुळे सुरुवातीच्या काळात यांच्या पक्षाला चांगले यश मिळाले. पण पुढील काळात ते यश ओसरत गेले. एकदा तर राज ठाकरे यांनी पक्षामध्ये व्यापक ऊर्जा भरण्यासाठी मी स्वतःच मुख्यमंत्रीपदासाठी निवडणूक लढणार असे जाहीर केले, पण पुढे प्रत्यक्ष राजकारणात उतरणे हे ठाकरे घराण्यातील लोकांच्या जीन्समध्ये नाही, असे सांगून त्यांनी माघार घेतली. पण पुढे त्यांचे मोठे भाऊ उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री म्हणून अडीच वर्षे काम पाहिले. राज जे बोलतात ते लोकांना पटते, मराठा आरक्षणाबाबत त्यांनी मांडलेल्या भूमिकेचा प्रत्यय सध्या येत आहे, कारण आरक्षणाचे गणित सोडवणे वाटते तितके सोपे नाही. आजही बरेचदा लोक आपल्या समस्या घेऊन राज ठाकरे यांच्याकडे जातात, कारण त्यांच्या आवाजात दम आहे, असा लोकांचा विश्वास वाटतो. वर्धापन दिनी भाषण करताना राज म्हणाले, मी जेव्हा विविध ठिकाणी दौऱ्यावर जातो आणि तिथल्या माताभगिनींना नमस्कार करतो, तेव्हा त्या माझे हात दोन्ही बाजूंनी धरून सांगतात की, आता फक्त तुमच्यावर विश्वास आहे. हे अगदी खरे आहे, पण या विश्वासाचे रूपांतर निवडणुकीच्या यशात का होत नाही, असा प्रश्न राज ठाकरे यांना स्वतःलाही पडत असेल.राज यांनी लाव रे तो व्हिडीओ या मोहिमेतून केंद्रातील मोदी सरकारवर टीकेची झोड उठवली होती. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनमधून तुम्ही काय वेगाने फापडा आणि ढोकळा खायला गुजरातला जाणार का, अशी खिल्ली उडवली होती. पण त्यानंतर राज ठाकरे यांच्यामध्ये बरेच परिवर्तन झाले. त्यांनी टोकाचा मोदीविरोध बाजूला ठेवला. इतकेच नव्हे तर त्यांच्या भाषणातून ते भाजपला पोषक ठरणारी भूमिका घेत आहेत, असे दिसू लागले. राज ठाकरे बाळासाहेबांप्रमाणे भाजपशी युती करणार असे वाटत असताना एकनाथ शिंदे यांनी बंड करून भाजपशी हातमिळवणी केली. त्यामुळे भाजपला सत्ता मिळाली. त्यानंतर भाजपला राज ठाकरे यांची तशी गरज राहिली नाही. देशभरात आता लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. निवडणुकीच्या तारखा केव्हाही जाहीर होतील. त्यावेळी राज ठाकरे यांनीही आपल्या पक्षात नवी ऊर्जा भरायला सुरुवात केली आहे. आजच्या घडीला राज ठाकरे यांच्या पक्षाकडे एकच आमदार आहे. लोकसभा निवडणुकीचा आवाका तर मोठा असतो. अजूनही मनसेला आपला खासदार निवडून आणता आलेला नाही. मनसेचा सुरुवातीचा यशस्वी काळ सोडला तर त्यानंतर त्यांनी विधानसभा निवडणुकांसाठी उभे केलेल्या उमेदवारांना जिंकणे सोडा, त्यांना त्यांचे डिपॉझिटही वाचवता आले नव्हते. सध्या महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यामध्ये जागावाटपासाठी जी रस्सीखेच सुरू आहे आणि जी गटबाजी उसळलेली आहे, ते पाहता मतदारही गोंधळात पडतील, अशी स्थिती आहे. त्यामुळे राज ठाकरे जसे म्हणतात, काही माताभगिनींनी आता तुमच्यावरच आमचा विश्वास आहे, असे सांगितले. सध्याच्या राजकीय गोंधळाच्या परिस्थितीत राज ठाकरे यांच्यावरील हा विश्वास मतदान यंत्रात उतरतो का, हे पहावे लागेल.

# लाभांश की मृत्यांश?



**जीव धोक्यात घालून मायदेशापेक्षा परदेश जवळ करण्याची वेळ या सर्वांवर येतेच का, याचा विचार आपण करणार आहोत की नाही? ग्रामीण महाराष्ट्रात अनेक करवादलेल्या आया आपल्या कामधाम नसलेल्या मुलांस सहजपणे कुठे निघालास मरायला असे विचारतात. यातून त्या मातांचा केवळ त्रागा व्यक्त होत असतो आणि म्हणून त्याचा शब्दार्थ विचारात घ्यावयाचा नसतो. तथापि हा प्रश्न आज भारतीय तरुणांना खरोखर विचारावा अशी परिस्थिती असून हे तरुण शब्दशः मरायला निघाल्यासारखे दिसतात. या वास्तवाचे ताजे दोन दाखले. इस्त्रायल आणि हमास युद्धात एक भारतीय तरुण मरण पावला आणि तिकडे युरोपात रशिया आणि युक्रेन युद्धातही सीमेवर भारतीय एका तरुणाने जीव गमावला तर अनेक जखमी झाले.**

रशिया-युक्रेन युद्धास नुकतीच दोन वर्षे झाली. या देशांत मानवी हातांची कमतरता असल्याने त्या देशांच्या वतीने प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सरळ त्यांच्यासाठी लढणाऱ्यांची भरती केली गेली आणि इस्त्रायलनेही भारतीय मजुरांस आपल्या देशाचे आमंत्रण दिले. या युद्धांत आपल्या तरुणांच्या या मृत्युवार्तेने खरे तर प्रत्येक भारतीयाचा संताप उफाळून यायला हवा आणि या हकनाक मरणांची आपणास लाज वाटायला हवी. युद्ध कोणाचे, लढणारे कोण आणि मरणारे कोण या प्रश्नांनी येथे घराघरांत अस्वस्थता निर्माण व्हायला हवी. पण तसे काहीच होताना दिसत नाही. समग्र भारतीय मन कोणी कोणास पाडले, कोण कोणास पाडणार आणि आपलेच घोडे कसे पुन्हा सत्तेत राहून देशास महासत्ता करणार या भाकड कथांत मश्गूल! भारतीय तरुणांच्या या अस्वस्थ वर्तमानाची दखलही आपण घेणार नसू तर आपणासारखे करंटे आपणच ठरू. याचे कारण जे समोर येत आहे ते भीषण आहे. रशियन विद्यापीठात प्रवेश देण्याची हमी देत शेकड्यांनी भारतीय तरुणांस त्या देशात पाठवले गेले आणि रशियात गेल्यावर त्यांच्या हाती बंदुका देऊन त्यांस युक्रेन विरोधात लढण्यास धाडले गेले. एरवी सत्ताधाऱ्यांच्या राजकीय विरोधकांस सळो की पळो करून सोडणाऱ्या केंद्रीय अन्वेषण विभागास (सीबीआय) या भानगडीची गंधवार्ताही नव्हती हे आणखी धक्कादायक. खरे तर या घोटाळ्याची आर्थिक बाजूही मोठी. तेव्हा आपल्या कार्यक्षम सक्तवसुली संचालनालय ऊर्फ ईडीनेही याची दखल घेण्यास हरकत नव्हती. पण यातील कोणीही काही केले नाही. द इंडियन एक्स्प्रेस सारख्या वृत्तपत्रांनी या मृत्युवार्ता ठसठशीतपणे प्रकाशित केल्यावर सरकारला जाग आली आणि मग या यंत्रणा काठ्या थोपटत कारवाईचा अभिनय करू लागल्या. रशियात शिक्षणासाठी गेलेल्या या भारतीय मुलांची पारपत्रेच संबंधितांनी काढून घेतली. त्यामुळे या अभागी भारतीय विद्यार्थ्यांस सीमेवर लढण्यास जाण्याखेरीज अन्य कोणता पर्यायच उरला नाही. हे भीषण आहे. यापेक्षाही भीषण इस्त्रायल संदर्भातील वास्तव. त्या देशात एका शेतावर काम करणारा तरुण बॉम्बफेकीत मारला गेला. त्या देशात माणसांची तशी कमतरताच. तेथे सरकार कोणाचेही असो. स्थानिक, उच्चवर्णीय गौर यहुदी आणि अन्य देशीय कनिष्ठ गौरेतर यहुदी हा भेदभाव असतोच असतो. तसेच प्रत्येक इस्त्रायली नागरिकांस लष्करी सेवा अत्यावश्यक असली तरी अतिकडवे, उजवे धर्मवादी यहुदी हे अपवाद. ते लढावयास जात नाहीत. हमास च्या नृशंस हल्ल्यानंतर त्या देशाने गाझा पट्टीत जे वंशच्छेद-सदृश हल्ले सुरू केले त्यामुळे त्या देशात काम करणाऱ्या हातांची कमतरता भासू लागली.

अशा वेळी माणसे पुरवायला आहेच भारत! या काळात जवळपास १८ हजार कुशल/अकुशल कामगारांची- अलीकडच्या लोकप्रिय भाषेत सांगावयाचे तर भारतमातेच्या सुपुत्रांची-निर्यात इस्त्रायलमध्ये झाली. भारताच्या प्रगतीचे इंजिन असलेल्या उत्तर प्रदेशात तर इस्त्रायलसाठी कामगारांची भरती केंद्रे उभारली गेली आणि हरियाणाही यात मागे नव्हता. या पवित्र कामासाठी हरियाणा सरकारच्या वेबसाइटवरच कशा कामगार भरतीच्या जाहिराती प्रसृत झाल्या होत्या याचे आणि या श्रमनियार्तीचे रसभरीत वृत्तांत ले माँद सह अनेक परदेशी वृत्तपत्रांनी प्रसृत केले. एका आकडेवारीनुसार या काळात एकट्या इस्त्रायलसाठी १८ हजार मजुरांची निर्यात झाली असा अंदाज आहे. हे सर्व राज्यांतून झाले. अलीकडे इस्त्रायलमधे मारला गेलेला तरुण केरळमधील होता. यातील काही निर्यात मजुरांच्या मुलाखती पाश्चात्त्य माध्यमांनी घेतल्या. सगळ्यांचा सूर एकच. पर्याय काय? मायदेशात हाताला काम नाही, आम्ही करायचे काय? या प्रश्नाचे उत्तर देणे दूरच; पण त्या प्रश्नास भिडण्यासही कोणी तयार नाही. या मजुरांस दरमहा साधारण १,३५००० रुपये इतक्या (१५०० युरो) भरभक्कम वेतनाचे आमिष दिले जात असेल तर ते नाही तरी कोणत्या तोंडाने म्हणणार. कारण यातील अनेकांची वार्षिक कमाईदेखील इतकी नसेल. तेव्हा मोठ्या प्रमाणावर भारतीय बेरोजगार पवित्र भूस (होली लँड) जवळ करते झाले. त्यांस चार पैसे मिळतीलही त्यामुळे. पण जिवाचे काय? जीव धोक्यात घालून मायदेशापेक्षा परदेश जवळ करण्याची वेळ या सर्वांवर येतेच का, याचा विचार आपण करणार आहोत की नाही, हा प्रश्न. युक्रेनवर रशियाने हल्ला केला संकटात आले कोण? भारतीय तरुण! इस्त्रायल-हमास युद्धात जीव धोक्यात कोण घालते? भारतीय तरुण. आणि आता तर तैवानशी भारताने या मजूर निर्यातीसंदर्भात करार केला असून उद्या चीन आणि तैवान यांच्यात काही तणाव निर्माण झाल्यास पुन्हा भारतीय तरुणांचा जीव संकटात येऊन येथे मागे राहिलेल्या त्यांच्या पालकांच्या जिवास घोर लागेल.तेव्हा या तरुणांच्या हातास येथेच अधिकाधिक कामे कशी मिळतील, यासाठी प्रयत्न व्हायला हवेत.

ते करायचे तर कारखानदारी युद्धगतीने वाढायला हवी आणि भांडवली बाजार, मध्यमवर्गीय या पलीकडे जाऊन अर्थगतीचा सम्यक विचार व्हायला हवा. त्यासाठी मथळा व्यवस्थापन कलेपेक्षा भरीव काही धोरणात्मक पावले उचलावी लागतील. तसे काही होताना दिसत नाही. सेवा क्षेत्र नावे अकुशल/ अर्धकुशल कामगारांच्या वाढत्या संख्येवर आपली अर्थव्यवस्था आणि सुखासीन मध्यमवर्गीय खूश आहेत. या मध्यमवर्गीय/ उच्चमध्यमवर्गीयांची पोरेटोरे विकसित देशांकडे डोळे लावून बसलेली आहेत. त्यांच्यापैकी कोणी गिग वर्कर्स म्हणवून घेणाऱ्यांत असण्याची शक्यता नसल्याने त्यांना यांच्या सुखदुःखांशी काही देणेघेणे असणारही नाही. कोणा धनदांडग्याने आपल्या विवाह सोहळ्यात कोणाकोणास कसे (किती देऊन) नाचवले याची लाळघोटी चर्चा करण्यात आणि यूट्यूबी प्रदर्शने पाहण्यात हा वर्ग दंग! अशा परिस्थितीत कोण कुठले युक्रेन-रशिया युद्ध वा इस्त्रायल-हमास संघर्ष यात आपल्या तरुणांनी का मरावे हा प्रश्न कोणास पडणार? पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धात आपल्यावर राज्य करणाऱ्या साहेबाने भारतीयांच्या पलटणी आघाडीवर पाठवल्याचा इतिहास आहे. पण तो इतिहास. तोही पारतंत्र्यातील. पण स्वतंत्र भारताच्या अमृतकाळतही हे वास्तव बदलू नये? मग ते पाच लाख कोटी डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेचे काय? हे प्रश्न महत्त्वाचे अशासाठी की केवळ या असल्या स्वप्न घोषणांनी आपले प्राक्तन बदलणारे नाही. ते बदलावयाचे असेल तर प्रचंड औद्योगिकीकरणाच्या जोडीने सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योगास गती द्यावी लागेल. ताज्या सरकारी आकडेवारीत या एमएसएमई क्षेत्राचे करुण वास्तव समोर येते आणि कृषी आणि या क्षेत्राचा घसरता टक्का पाहून काळजी वाटू लागते.त्यासाठी या निवडणुकीच्या हंगामात उन्मादी उच्छृंखलतेपेक्षा या वास्तविक प्रश्नांस भिडण्याचे गांभीर्य राजकीय पक्षांस नसले तरी नागरिकांस दाखवावे लागेल. डेमॉग्राफिक डिव्हिडंड हा शब्द अलीकडे गायब झालेला दिसतो, हे खरे. पण म्हणून या लोकशाही लाभांशाचे रूपांतर मृत्यांशात होणे अयोग्य.

# कार्गो जेट्टी जेएसडब्ल्यू कंपनीला देण्यास मंजुरी

**उरण :** जेएनपीएने नव्याने उभारलेल्या ३१४ खर्चाच्या ॲडिशनल लिक्विड कार्गो जेट्टी सर्वाधिक बोली लावलेल्या व यशस्वी ठरलेल्या जेएसडब्ल्यू इन्फ्रा स्ट्रक्चरल कंपनीला देण्यावर मंगळवारी (५) झालेल्या बोर्ड ऑफ ट्रस्टींच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. जेएनपीएच्या मालकीची ही अखेरची जेट्टीही पीपीपी तत्त्वावर चालविण्यासाठी देण्यात आली आहे.

जेएनपीएची बंदरात एसबी -०२ व एसबी -०३ या दोन्ही बर्थ बीपीसीएल, इंडियन ऑईल कंपनीला चालविण्यासाठी देण्यात आलेल्या होत्या. या जुन्या जेट्टीच्या दोन्ही बाजूला बर्थिंगची सोय असल्याने दोन्ही बर्थवर पीओएल, एलपीजी, ईडीबल ऑईल, मोलॅशिस आणि इतर अनेक प्रकारच्या केमिकल जहाजांची वाहतूक केली जात आहे. वाढत्या तरल पदार्थांच्या हाताळणीसाठी सध्याचे लिक्विड बल्क टर्मिनल अपुरे पडत असल्याने जहाजांसाठी प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे आयात व्यापाऱ्यांना नाहक अतिरिक्त वेळ, पैसा खर्च करावा लागतो. त्यामुळे आर्थिक नुकसान होते.

जुन्या जेटीच्या दोन्ही बाजूला जहाजे एकाच वेळी हाताळण्याची सुविधा या जेट्टीला लागून असलेल्या दुहेरी बर्थमध्ये आहे. जुन्या केमिकल जेट्टीची क्षमता ६.५ मिलियन टन इतकी आहे. लिक्विड कार्गो जेट्टीला जोडूनच अतिरिक्त आणखी जेट्टी ४६५ मीटर पर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे ॲडिशनल लिक्विड कार्गो जेट्टीमुळे केमिकल वाहतुकीची क्षमता दुपटीने वाढली आहे.



**कंपनीचे नाव, दर प्रती मेट्रिक टन**

- जेएसडब्ल्यू इन्फ्रा स्ट्रक्चरल : २५२ रुपये
- आयएमसी : १५५ रुपये
- भारत पेट्रोलियम कार्पोरेशन : १०८ रुपये
- अम्मा लाईन्स प्रा.लि/बीओएमएस ९० रुपये
- जेएम बॉक्स पोर्ट ॲण्ड लॉजिस्टिक : ७६ रुपये
- गणेश बॅन्जो प्लास्ट सीव्हीपी इन्फ्रा प्रोजेक्ट : ७४ रुपये
- अर्गस लॉजिस्टिक : ६४ रुपये

या सात कंपन्यांमध्ये जेएसडब्ल्यू इन्फ्रा स्ट्रक्चरलची बोली सर्वात मोठी रॉयल्टी देणारी ठरली आहे. यशस्वी ठरलेली कंपनी ३० वर्षांसाठी पीपीपी देण्यावर मंगळवारच्या (५) बोर्ड ऑफ ट्रस्टींच्या बैठकीत मंजुरी देऊन शिक्कामोर्तब करण्यात आले असल्याची माहिती जेएनपीए अधिकाऱ्यांनी दिली.


# जिल्ह्यात यंदाही टंचाईच्या तीव्र झळा

## धरणात ५० टक्केच पाणीसाठा उपलब्ध

**अलिबाग :** रायगड जिल्ह्यातील २८ धरणांत ५०.५२ टक्के जलसाठा उपलब्ध आहे. धरणात असलेला जलसाठा हा पावसाळ्यापर्यंत पुरवण्यासाठी प्रशासनातर्फे नियोजन करणे आवश्यक आहे, अन्यथा उन्हाळ्यात पाणीटंचाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्ह्यातील आठ धरणांतील साठा हा ४० टक्क्यांहून कमी झाला आहे. त्यामुळे यंदा जिल्ह्यात तीव्र पाणीटंचाई समस्येला नागरिकांना सामोरे जावे लागणार आहे. उन्हाळ्यात लोकसभा निवडणूकही असल्याने पाणीटंचाई मुद्दा ऐरणीवर राहणार यात शंका नाही. रायगड जिल्ह्यात मुरुड (१), तळा (१), रोहा (१), पेण (१), अलिबाग (१), सुधागड (५), श्रीवर्धन (३), म्हसळा (२), महाड (४), कर्जत (२), खालापूर (३), पनवेल (३), उरण (१) या १३ तालुक्यांत २८ धरणे बांधली गेली आहेत. या धरणांतून जिल्ह्यातील तसेच नवी मुंबईतील नागरिकांना पाणीपुरवठा केला आहे. जिल्ह्यातील २८ धरणांत ६८.२६१ दलघमी पाण्याच्या साठ्याची क्षमता आहे. अनेक धरणे ही ३० ते ४० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेली आहेत. ही धरणे त्याकाळी मातीने बांधली गेली आहेत. त्यामुळे काही धरणांना गळतीही लागली आहे. यंदा रायगड जिल्ह्यात पाऊस सरासरी इतका झाला. धरण भागात उत्तम पाऊस पडल्याने सर्व धरणे ही १०० टक्के भरली होती. त्यामुळे जिल्ह्याचा पाणी प्रश्न गंभीर रूप धारण करेल, असे वाटत नव्हते. परंतु मार्च महिन्यातच धरणातील पाणीपातळी कमालीची खाली गेली आहे. सध्याचा धरणातील पाणीसाठा पाहता पुढे पुढे गंभीर स्थिती निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत. नवीन प्रस्तावित असलेली धरणे ही अजून कागदावरच राहिली आहेत. जिल्ह्यात सध्या २८ धरणात ३४.४८३ दलघमी पाणीसाठा शिल्लक आहे. म्हणजे ५०.५२ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे. सध्या उन्हाळ्याचे चटके जाणवू लागले आहेत. धरणातील पाणी पातळी हळूहळू कमी होऊ लागली आहे. मार्च, एप्रिल, मे हे महिने तीव्र उन्हाचे असल्याने या काळात पाण्याची अधिक गरज असते. मात्र, धरणातील कमी होऊ लागलेला जलसाठा चिंता निर्माण करणारा दिसत आहे. त्यातच काही दिवसांत लोकसभा निवडणूक होणार आहे. त्यामुळे पाणी समस्येचा प्रश्न निवडणुकीत विरोधकांकडून ऐरणीवर राहणार आहे हे नक्की.



# 1993 Bombay bombings: HC relief to 2 former Excise officials accused of allowing landing of explosives




**Mumbai :** The Bombay High Court has granted relief to two retired Central Excise officials, nearly 20 years after disciplinary action orders against them for allegedly allowing landing of explosives used in the 1993 serial bomb blasts in the city. There was no evidence to prove the charges against them in the departmental proceedings, a division bench of Chief Justice Devendra Kumar Upadhyaya and Justice Arif Doctor said while quashing the disciplinary action orders. The duo, S M Padwal and Yashwant Lotale, retired superintendents of the Central Excise department, shall be entitled to all consequential benefits such as arrears of salary and pension, which shall be made available to them within two months, the HC said in its judgment on March 4. Twelve bombs went off at different locations in Mumbai on March 12, 1993, killing 257 persons and injuring more than 700 others. A special court later convicted 100 persons in the case and acquitted 23 others. The HC noted that Padwal and Lotale did not face any criminal trial in the case. Based on the alleged evidence available, the charges against them do not stand proved, it said. "Our indefeasible conclusion is that it is a case where there was no evidence at all and accordingly, the conclusion arrived at by the disciplinary authority while passing the punishment orders is erroneous," the HC said. The high court said the only evidence available against them is the alleged confessional statements made by the accused persons to the police during investigation. "In our opinion, this (confessional statements) could not be made basis of inflicting the punishment upon the employees in this case," the bench said. Padwal and Lotale were charged for accepting illegal gratification to permit landing of the consignments containing explosives, arms and ammunition that were used in the bomb blasts. They were charged with failure to maintain absolute integrity and devotion of duty and for having acted in a manner unbecoming of a government servant. While Padwal was ordered to be dismissed from service, Lotale was handed over compulsory retirement and was held to be entitled to only 65 per cent of the full compensation of pension and gratuity. Both the officers challenged the orders before the Central Administrative Tribunal. While Padwal's dismissal order was quashed by the tribunal, Lotale's disciplinary order was upheld. Lotale then moved the high court in appeal, while the Union government filed a petition in the HC against the tribunal order granting relief to Padwal.

# Shreyas Iyer gets 'outstanding' mention in India dressing room; Jay Shah rewards Gill, Rohit after England win



**Mumbai :** The fielding medals are back! Having made its debut during the 2023 World Cup, where the special award was given in the Indian dressing room after every match, the team's fielding coach, T Dilip, waited until the end of the arduous England Test series to announce the winner of the medal. However, there was a slight twist in the announcement, with as many as three medals being given away by BCCI secretary Jay Shah, who was present in the dressing room for the new post-game tradition in Dharamsala. Dilip revealed that a new "flavour" has been added to India's tradition with two separate medals to be given out, explaining that "in Test cricket, brilliance of a catch and also relentless effort on the field, both play a crucial role." Dilip started off the ritual by revealing some of the "collective efforts that lit up the series," which is when Shreyas Iyer earned a special mention for his stunning run out of England captain Ben Stokes on Day 4 of the second Test in Vizag. The run-out dismissal was a pivotal point in India bouncing back from the defeat in the series opener in Hyderabad to level the contest at 1-1. "Shreyas is not here but initial games he was brilliant on the field with his catches and outstanding that run out. He made a lot of difference," Dilip said before taking the names of Kuldeep Yadav, Sarfaraz Khan, Rohit Sharma and Shubman Gill as well.

# गुंतवणुकीच्या माध्यमातून कोट्यवधींची फसवणूक करणाऱ्याला बेड्या

## पश्चिम विभाग सायबर पोलिसांची कारवाई

**मुंबई :** गुंतवणुकीच्या माध्यमातून (इन्व्हेस्टमेंट फ्रॉड) नागरिकांना गंडा घालणाऱ्या आरोपीला पश्चिम विभाग सायबर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. भरत चव्हाण (३४) असे अटक आरोपीचे नाव असून तो वांद्रे पूर्वेकडील खेरवाडी परिसरातील रहिवासी आहे. पोलिसांनी या कारवाईत ३३ बँक खात्यांमध्ये ८२ लाख रुपये गोठवले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी चव्हाण याच्यासह विविध व्हॉट्सअॅप धारकांनी आपसात संगनमत करून गुन्ह्यातील फिर्यादी संदीप देशपांडे (६८) यांची १४ डिसेंबर २०२३ ते ६ फेब्रुवारी २०२४ या काळात सुमारे एक कोटी १२ लाख २६ हजार रुपयांची फसवणूक केली होती.

देशपांडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पश्चिम विभाग सायबर पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात आरोपींविरोधात भादंवि आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये



खेरवाडीतील रहिवासी आरोपी भरत चव्हाण आणि त्याच्या साथीदारांनी बनावट कंपन्या स्थापना करून त्या माध्यमातून चालू बँक खाती उघडली. या खात्यांमध्ये फसवणुकीच्या मोठ्या रकमांचे व्यवहार झाल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे.

गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. आरोपींनी संगनमताने कट रचून देशपांडे यांच्या व्हॉट्सअॅप क्रमांकावर ऑनलाइन शेअर मार्केट संबंधित नोटिफिकेशन पाठवण्यास सुरुवात केली. पुढे, देशपांडे यांना जॉनाथन सायमन एलाईट प्रॉफिट एक्स्चेंजर नावाच्या ग्रुपचे सदस्य बनवून घेत शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला मोबदला मिळेल, असे सांगून त्यांचा विश्वास संपादन केला. देशपांडे यांचे बनावट वेबसाईटवर अकाऊंट तयार करून त्यात पैसे भरून घेतले.

खात्यात जमा झालेल्या पैशांतून शेअर्स खरेदी-विक्री केल्याचे तसेच नफा झाल्याचे भासवत एकूण एक कोटी १२ लाख २६ हजार रुपये उकळले. देशपांडे यांनी झालेला नफा आणि भरलेली रक्कम परत करण्याची विनंती केली. त्यावर त्यांना कर भरावा लागेल, असे सांगून आणखी पैशांची मागणी सुरू झाली. त्यानंतर मात्र आपली आर्थिक फसवणूक झाल्याची तक्रारदारांची खात्री पटली आणि त्यांनी पश्चिम विभाग सायबर पोलीस ठाण्यात जात तक्रार दिली. देशपांडे यांच्याकडून घेतलेली रक्कम आरोपींनी एका बँक खात्यात जमा करून घेतली होती. पुढे ही रक्कम विविध बँकांमधील वेगवेगळ्या खात्यांमध्ये वळती करण्यात आली. पोलिसांनी या बँक खात्यांची संबंधित बँकांकडून घेत एकूण ३३ बँक खात्यांमध्ये ८२ लाख रुपये गोठवले. पुढील तपासात आरोपी चव्हाण याचा गुन्ह्यातील सहभाग समोर येताच पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत.

## कल्याणमध्ये सर्पदंशाने कुत्र्याचा मृत्यू

**कल्याण :** कल्याण पश्चिमेत गोदरेजहिल परिसरातील स्वप्ननगरी बिल्डिंगच्या मागील बाजूस साडेचार फुटी कोब्रा जातीच्या विषारी नागाने दंश केल्याने कुत्र्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. गेल्या आठवड्यापासून वातावरणात कमालीचा बदल होत असून रात्री थंड तर दिवसा गरम असे हवामान सुरू आहे. वाढत्या गरमीमुळे नागरी वस्त्यांमधील लॉनच्या थंडगार आवारात गारव्यासाठी साप आढळल्याच्या घटना वाढू लागल्या आहेत. शुक्रवारी रात्री ११.३०च्या सुमारास गोदरेजहिल येथील स्वप्ननगरी बिल्डिंगच्या मागील बाजूस लॉनवरील स्पार्टेक्स लादीच्या आवारात नागाने घराच्या गेट लगत रॉकट विकर जातीच्या कुत्र्याला दंश केल्याचे येथील रहिवासी म्यॅथ्युज यांनी पाहिले. यामध्ये कुत्रा मृत पावल्याने पुढे उपस्थितांची धांदल उडाली. म्यॅथ्युज यांनी सर्पमित्र दत्ता बोंबे यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी घटनास्थळी दाखल होत कोब्रा नागाला पकडल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला. वनअधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कोब्रा जातीच्या या नागास जंगलात सोडण्यात आल्याचे बोंबे यांनी सांगितले.

# पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पसार झालेल्या आरोपीला गुजरातमध्ये बेड्या

**मुंबई :** पोलिसांच्या हातावर तुरी देऊन गुजरातमध्ये पसार झालेल्या १९ वर्षीय आरोपीला गजाआड करण्यात विशेष पोलीस पथकाला यश आले आहे. साहिल अली शाहिद अली शहा असे आरोपीचे नाव असून, नवघर पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत.

मुलुंड पूर्व परिसरात घडलेल्या एका जबरी चोरीच्या गुन्ह्यात पाहिजे आरोपी असलेल्या गोवंडीतील रहिवासी मोहम्मद मोईन यामीन कुरेशी ऊर्फ मोना (२३) आणि साहिल अली शाहिद अली शहा (१९) यांचा नवघर पोलिसांनी ५ मार्चच्या दुपारी ऑर्थर रोड मध्यवर्ती कारागृहातून ताबा घेतला. पोलीस ठाण्याच्या गाडीतून त्यांना नवघर पोलीस ठाण्यात नेण्यात येत होता.

दुपारी २ च्या सुमारास गाडी टिळकनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत छेडानगर जंक्शनवर पोहोचताच आरोपी साहिल याने पोलिसांच्या हाताला झटका देऊन गाडीतून उडी मारुन पळ काढला. पोलिसांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न केला, मात्र तो सापडला नाही. अखेर पोलिसांनी या प्रकरणी टिळकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून विशेष पथकांच्या माध्यमातून आरोपी साहिलचा शोध सुरू केला.

पोलिसांनी लोकमान्य टिळक टर्मिनन्स आणि वांद्रे टर्मिनन्स येथे शोध घेत सीसीटीव्ही फुटेज तपासले. यात आरोपी साहिल हा वांद्रे टर्मिनन्स येथून सुरतकडे रवाना होणाऱ्या ट्रेनमधून जात असल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाले होते. त्याच्यासोबत असलेला आणखी एक व्यक्ती पोलिसांनी हेरला. पोलिसांनी या साथीदाराच्या मोबाईल क्रमांकाची माहिती मिळवून त्या माध्यमातून आरोपी साहिलचा माग काढला.

आरोपी साहिल हा गुजरातच्या वापीमध्ये पोहोचत असताना पोलिसांनी ही माहिती गुजरात पोलिसांना दिली. त्यानुसार, गुजरात पोलिसांच्या गुन्हे शाखेने आरोपी साहिल याला ताब्यात घेतले. त्यानंतर, नवघर पोलिसांनी गुजरातमध्ये जात आरोपी साहिल याला ताब्यात घेऊन अटक केली आहे.

# भाभा हॉस्पिटलमध्ये अपॉईंटमेंटसाठी लिंक पाठवून लाखांवर डल्ला

**मुंबई :** भाभा हॉस्पिटलमध्ये अपॉईंटमेंट देण्यासाठी लिंक पाठवून त्यात रुग्णाची माहिती भरून १० रुपये पाठवण्यास सांगत सायबर ठगाने एका तरुणाच्या बँक खात्यातून २ लाख १६ हजार रुपये ऑनलाइन लंपास केल्याचा प्रकार कुर्ल्यात घडला. या प्रकरणी संजयकुमार सिंग नावाच्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून नेहरू नगर पोलीस अधिक तपास करत आहेत.



कुर्ला पूर्व परिसरातील रहिवासी नंदलाल (३६) हा एका हेल्थकेअर कंपनीमध्ये नोकरी करतो. ३ मार्चच्या सकाळी बहिणीला उपचारांसाठी भाभा रुग्णालयात नेण्यासाठी त्याने गुगलवर या रुग्णालयाचा संपर्क क्रमांक शोधला. मिळालेल्या मोबाईल क्रमांकावर नंदलाल याने कॉल केला. पण, कॉल लागला नाही. काही वेळाने त्याच नंबरवरून नंदलाल याला कॉल आला.

कॉल करणाऱ्या व्यक्तीने त्याचे नाव संजयकुमार सिंग असे असून, भाभा हॉस्पिटलमधून बोलत असल्याची बतावणी केली. पुढे, त्याने काय मदत पाहिजे आहे, अशी विचारणा करत नंदलाल याच्याकडून त्याच्या बहिणीच्या आजारपणाची माहिती आणि टेस्टचे रिपोर्ट मागून घेतले. भाभा हॉस्पिटल येथे होतील, असे सांगून अपॉईंटमेंट घेण्यासाठी एक लिंक पाठवून त्यात रुग्णाची माहिती भरून १० रुपये पेमेंट करण्यास सांगितले.नंदलाल याने लिंकवर माहिती भरून गुगल पे, पेटीएम तसेच फोन पेच्या माध्यमातून पेमेंट करण्याचा प्रयत्न केला. पेमेंट होत नसल्याने नंदलाल याने त्या मोबाईल नंबरवर पुन्हा कॉल करून पेमेंट होत नसल्याचे सांगितले. तेव्हा त्याने ५ मार्चची अपॉईंटमेंट मिळाल्याचे सांगून कॉल कट केला. त्यानंतर मात्र खात्यातून पैसे जात असल्याचे मेसेज नंदलाल आणि त्याच्या भावाला येऊ लागले. या दोघांच्या खात्यातून एकूण २ लाख १६ हजार १०० रुपये ऑनलाइन लंपास करण्यात आले होते.

भाभा हॉस्पिटलमध्ये अपॉईंटमेंट देण्यासाठी लिंक पाठवून १० रुपये भरण्यास सांगणाऱ्या संजयकुमार सिंग नावाच्या व्यक्तीने आपल्याला २ लाख १६ हजारांना सायबर गंडा घातल्याचे नंदलाल याची खात्री पटली. अखेर नंदलाल याने नेहरू नगर पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली आहे.

## अज्ञात चोरट्याकडून दागिन्यांची बॅग लंपास

**ठाणे :** पोखरण रोड नं २ येथील राहत्या घराच्या उघड्या दरवाजावाटे अज्ञात चोरट्याने प्रवेश करून ६ लाख ९३ हजारांचे दागिने ठेवलेली बॅग घेऊन पोबारा केला. याबाबत वर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारदार महिला (६०) पोखरण रोड येथे वास्तव्यास आहे. ५ ते ६ मार्चदरम्यान घराच्या उघड्या दरवाजामधून अज्ञात चोरट्याने प्रवेश केला आणि घरातील सोन्याचे दागिने ठेवलेली बॅग घेऊन पोबारा केला. बॅगमध्ये ६ लाख ९३ हजाराचे दागिने होते, असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. याप्रकरणी वर्तकनगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रक्तचंदन तस्करी; आरोपींच्या मालमत्तेवर ईडीची टाच

**मुंबई :** आखाती देशात पाठवण्यात येणाऱ्या रक्तचंदन तस्करीप्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) आरोपी बादशाह माजिद मलिक, विजय सुबण्णा पुजारी आणि अन्य जणांशी संबंधित ७२ कोटी ४५ लाख रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली आहे. महसूल गुप्तवार्ता संचलनालयाने (डीआरआय) २०१५ मध्ये न्हावा शेवा बंदरात कारवाई करत ७ हजार ८०० मेट्रिक टन रक्तचंदन जप्त केले होते. या प्रकरणाचा तपास करत ईडीने जप्तीची कारवाई केली आहे.

सागाचे लाकूड निर्यात करण्याच्या आडून रक्तचंदन आखाती देशात पाठवण्यात येणार असल्याची माहिती डीआरआयला मिळाली होती. त्यानुसार, डीआरआयच्या पथकाने न्हावा शेवा बंदरात कारवाई करत



मालवाहू जहाजातून ७ हजार ८०० मेट्रिक टन रक्तचंदन जप्त केले. रक्तचंदन तस्करीत सक्रिय असलेल्या मलिक आणि पुजारी यांच्यासह अन्य आरोपींविरोधात सीमाशुल्क कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून डीआरआयने तपास सुरू केला होता.

आरोपी लाकूड, कपड्यांचा डिंक, रेडिएटर्स व रंग मिश्रणाच्या नावाखाली रक्तचंदनाची तस्करी करत होते. त्यासाठी आरोपींनी सेझ क्षेत्रातील कंपन्यांच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार केली होती. ईडीने या प्रकरणी तपास केला असता, आरोपी मलिक २००८ ते २०१० आणि २०१४ ते २०१५ या कालावधीत रक्तचंदनाच्या तस्करीतून सुमारे ९४ कोटी रुपयांची रक्कम कमावली.आरोपी मलिकने ही रक्कम चलनात आणण्यासाठी एम्पायर इंडिया मल्टी ट्रेड प्रा. लि. नावाची कंपनी स्थापन केली होती. त्यानंतर बनावट कंपन्यांमार्फत या कंपनीत शेअर बाजारातून गुंतवण्यात करण्यात आली होती. कंपनीच्या माध्यमातून मलिक व त्याच्या साथीदारांनी अनेक स्थावर मालमत्ता खरेदी केल्याचे उघड झाले. ईडीने या प्रकरणी २० डिसेंबर २०२१ रोजी मलिक, पुजारी आणि अन्य आरोपींशी संबंधित आठ ठिकाणी छापेमारी करत मलिकला अटक केली होती.

## इन्स्टाग्रामवर अश्लील व्हिडीओ पोस्ट करून खंडणीची मागणी

**मुंबई :** इन्स्टाग्रामवर अश्लील व्हिडीओ पोस्ट करत तो हटवण्यासाठी सिक्युरिटी एजन्सीच्या कर्मचाऱ्याकडे १० लाखांच्या खंडणीची मागणी करण्यात आल्याचा प्रकार गोरेगावमध्ये समोर आला. या प्रकरणी गुन्हा दाखल करून गोरेगाव पोलीस अधिक तपास करत आहेत.सिक्युरीटी एजन्सीमध्ये काम करणाऱ्या ५४ वर्षीय तक्रारदार यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, १ आणि २ मार्च या दोन दिवसांत ही घटना घडली. यातील आरोपींनी तक्रारदार यांचे बनावट इन्स्टाग्राम आयडी तयार करून त्यावरून अश्लील व्हिडीओ पोस्ट केला. पुढे, हाच व्हिडीओ हटवण्यासाठी त्यांच्याकडे १० लाखांच्या खंडणीची मागणी करण्यात आली. या धक्कादायक प्रकारानंतर तक्रारदार यांनी गोरेगाव पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली आहे.

# बीएसई व्यवस्थापकही सायबर जाळ्यात

## बिटकॉईन ट्रेडिंगच्या नावाखाली दोन लाखांना गंडा

**मुंबई :** फेसबुकवर ऑनलाइन बिटकॉईन ट्रेडिंगची जाहिरात बघून त्यात गुंतवणूक करणे बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजमध्ये (बीएसई) वरिष्ठ व्यवस्थापक पदावर नोकरी करत असलेल्या ३८ वर्षीय तरुणीला चांगलेच महागात पडले आहे. सायबर ठगांनी या तरुणीला २ लाखांना गंडा घातला असून, या प्रकरणी मुलुंड पोलीस अधिक तपास करत आहेत.

मुलुंड पश्चिमेकडील एन. एस. रोड परिसरात राहात असलेली ३८ वर्षीय तक्रारदार तरुणी बीएसईमध्ये सीनियर मॅनेजर पदावर कार्यरत आहे. ११ जानेवारीच्या सकाळी फेसबुकवर सर्फिंग करत असताना तिला ख्रिस्तीना पेनाटे नावाची प्रोफाईल दिसली. या प्रोफाईलवर तक्रारदार तरुणीच्या फेसबुक मित्राने 'धन्यवाद पैसे कमवून देण्यासाठी' अशी पोस्ट




टाकल्याचे तिला दिसले. फेसबुक पोस्टमध्ये फेसबुक पेजची लिंक देण्यात आली होती. तक्रारदार तरुणीने लिंकवर क्लिक केले असता, ख्रिस्तीना पेनाटे हे फेसबुक अकाऊंट उघडले जाऊन त्यात बिटकॉईन ट्रेडिंग करून अधिक पैसे कसे मिळतील, याबाबत माहिती देणाऱ्या भरपूर पोस्ट होत्या. या पोस्ट बघून तक्रारदार यांनी ख्रिस्तीना पेनाटे नावाच्या महिलेशी मेसेंजरच्या माध्यमातून चॅट करत बिटकॉईन ट्रेडिंगबाबत विचारणा केली.बिटकॉईन ट्रेडिंगसाठी सुरुवातीला कमीतकमी ५० हजार रुपये गुंतवावे लागतील, असे सांगून तक्रारदार तरुणीला नोंदणी करण्यासाठी एक लिंक पाठवण्यात आली. तरुणीने लिंक ओपन करून त्यात माहिती भरत ५० हजार रुपये पाठवले. तिला ट्रेडिंग खात्यात ५ बिटकॉईन जमा झाल्याचे दिसले. या बिटकॉईनचे भारतीय चलनात ६ लाख रुपये होत असून, रक्कम काढण्यासाठी आणखी एक लिंक देण्यात आली.तक्रारदार तरुणीने लिंक ओपन केली असता, त्यात ८५ हजार रुपये भरावे लागतील, असा मेसेज आला. ६ लाखांच्या लालसेने तरुणीने ही रक्कमही भरली. मात्र, पैसे काढता न येता चार एम्प्टी ट्रेड असून त्यासाठी आणखी ६५ हजार रुपये भरण्यास सांगण्यात आले. तिने ही रक्कमसुद्धा भरली, तरीसुद्धा रक्कम काढता न आल्याने आपली आर्थिक फसवणूक झाल्याची तरुणीची खात्री पटली. तोपर्यंत तिने २ लाख रुपये गमावले होते. अखेर तिने मुलुंड पोलिसांत तक्रार दिली आहे.

## महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी पळवली

**भिवंडी :** भिवंडी शहर परिसरात घरफोडी सोनसाखळी चोरीच्या घटना होत असल्याने नागरिकांनामध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.असे असतानाच सकाळी बाजारहाट करण्यासाठी चाललेल्या एका महिलेच्या गळयातील मंगळसूत्र चोरटयांनी पळवल्याची खळबळजनक घटना घडली आहे.याबाबत पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. भिवंडी शहरातील कामगार वस्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पद्मानगर परिसरात राहणाऱ्या सुनिता राजाराम तांबे या महिला सकाळी साडे आठ वाजताच्या सुमारास भाजी खरेदी करून घरी परतत असताना परिसरातील सागर ज्योती बार समोर मोटारसायकल वरून आलेल्या दोघा चोरटयांपैकी मागे बसलेल्या चोरटयाने महिलेच्या गळयातील सुमारे ७० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र खेचून महिलेस दुखापत करून पोबारा केला आहे .या प्रकरणी महिलेने दिलेल्या तक्रारीवरून भिवंडी शहर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरटया विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शहरात पिस्तुले विक्रीसाठी आलेल्या दोघांना बेड्या



**मुंबई :** अंधेरी-सहार रोड आणि महालक्ष्मी रेल्वे स्थानक येथे पिस्तुले विक्रीसाठी आलेल्या दोघांना अटक करत गुन्हे शाखेने त्यांच्याकडून तीन पिस्तुले आणि सात जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. या प्रकरणी विलेपार्ले आणि ताडदेव पोलीस ठाण्यांमध्ये दोन स्वतंत्र गुन्हे दाखल केले आहेत.

अंधेरी-सहार रोडवर एक जण पिस्तुल विक्रीसाठी येणार असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या कक्ष ८ ला मिळाली होती. त्यानुसार, कक्षाचे प्रभारी पोलीस निरीक्षक लक्ष्मीकांत साळुंखे यांच्या नेतृत्वातील पथकाने शनिवारी दुपारी एकच्या सुमारास सापळा रचून आरोपी रवी मनोहर बागडी (३५) याला ताब्यात घेतले. अंगझडतीमध्ये त्याच्या जवळ एक देशी बनावटीचे पिस्तुल आणि दोन जिवंत काडतुसे सापडली. बागडी हा विलेपार्ले येथील रहिवासी असून या प्रकरणी विलेपार्ले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. दुसरी कारवाई महालक्ष्मी रेल्वे स्थानकाजवळील डॉ. ई. मोजेस रोडवर झाली. येथील बस थांब्यावर पिस्तुले विक्रीसाठी आलेल्या राजेश खेडेकर (२१) याला गुन्हे शाखेच्या कक्ष २ चे प्रभारी पोलीस निरीक्षक मंगेश देसाई यांच्या नेतृत्वातील पथकाने शनिवारी बेड्या ठोकल्या. आरोपी खेडेकर याच्याकडून देशी बनावटीची दोन पिस्तुले आणि पाच जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. खेडेकर विरोधात ताडदेव गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे.

# ११ वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार

**मुंबई :** शिकवणीवरून घरी परतत असलेल्या ११ वर्षांच्या मुलीला २६ वर्षीय नराधम शेजाऱ्याने जबरदस्तीने उचलून घरी नेत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना शनिवारी सायंकाळी अॅन्टॉप हिलमध्ये घडली. पीडित मुलीच्या आईने दिलेल्या फियार्दीवरून, या प्रकरणी बलात्काराच्या भादंवि कलमासह पॉस्को कायद्यान्वये गुन्हा दाखल करून अॅन्टॉप हिल पोलीस अधिक तपास करत आहेत.येथील कोकरी आगार परिसरात राहात असलेल्या ३३ वर्षीय फिर्यादी यांचा शिलाईकामाचा व्यवसाय आहे. त्यांची ११ वर्षीय मुलगी येथील एका शाळेत शिकते. नेहमीप्रमाणे शनिवारी सायंकाळी खासगी शिकवणीसाठी गेलेली ही मुलगी साडेसातच्या सुमारास घरी परतत होती. तिच्या मागावर असलेल्या २६ वर्षीय शेजाऱ्याने या मुलीला रस्त्यात अडवून जबरदस्तीने राहत्या घरी नेले. येथे आरोपीने मुलीला धमकावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. आरोपीने या आधीसुद्धा मुलीला उचलून आपल्या घरी नेत तिच्यावर लैंगिक अत्याचार केले होते. अत्याचार सहन होत नसल्याने अखेर पीडित मुलीने याबाबत आईला सांगितले. त्यानंतर आईने मुलीला सोबत घेऊन अॅन्टॉप हिल पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

# अखेर वानर वनविभागाच्या जाळ्यात अडकले

**कसारा:** शहापूर तालुक्यातील कसारा गावात मागील काही दिवसांपासून वानराने धुडगूस घातला होता.गावातील खाद्य पदार्थांच्या शोधात पाहुणा म्हणून थांबलेल्या वानर नागरिकांच्या चर्चेचा आणि चिंतेचा विषय बनला होता.नुकताच विहिगाव वनविभागाच्या वनपरिक्षेत्र अधिकारी चेतना शिंदे यांच्या मार्गदर्शनाने कर्मचाऱ्यांनी रिपाइं कार्यालयात शिरलेल्या वानराला मोठया शिताफीने जाळ्यात अडकवले.



◆वनविभागाला माहिती मिळाल्यानंतर वनपाल भाऊ भोईर यांनी कर्मचाऱ्यांच पथक घेऊन कार्यालयाच्या मुख्य दरवाजावर पिंजरा लावला .त्यानंतर त्या पिंजऱ्यात खाद्यपदार्थ ठेवून वानराला खाण्याच्या नादात जेरबंद केले .गेल्या अनेक दिवसांपासून वानराला पकडण्याच प्रयत्न करणाऱ्या वन कर्मचाऱ्यांना यश आले आहे .गावात वानर आल्याच्या चर्चेला अखेर पूर्णविराम मिळाला.

कसारा गावात मुख्य बाजारपेठेत वानराचा वावर होता.कुणी डिवचण्याचा प्रयत्न केला की,त्याला तो भीती दाखवत असे.इतकेच नव्हे तर अतिशय चतुर असलेला वानराने मागील २० दिवसांहून अधिक दिवस गावात मुख्य बाजारपेठेतील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या राजकीय पक्षाच्या कार्यालयाचा ताबा घेतला. दरम्यान विभागाध्यक्ष देवीदास भोईर यांनी कार्यकर्त्यांच्या मदतीने कार्यालयाचा दरवाजा लावत वानराला कोंडले.

# डोंबिवलीत भाजपाच्या फलकाला काळे फासले



भाजप केंद्र सरकारच्या कार्यक्रमाप्रमाणे डोंबिवलीतील भाजप पदाधिकार्यांनी डोंबिवलीत पुन्हा एकदा मोदी सरकार आणि त्याच्या बाजुला भाजपचे कमळ चिन्ह अशा स्वरूपाच्या जाहिराती सार्वजनिक, खासगी ठिकाणच्या भिंती, संरक्षक भिंतीवर काढून भाजपची प्रचार मोहीम सुरू केली आहे. शनिवारी सकाळी कोपर येथील भाजपचे कार्यकर्त्यांनी काढलेल्या सर्वच कमळ चिन्हांवर काळे फासले असल्याचे दिसले. यासंबंधी त्यांनी पक्षातील वरिष्ठांना त्याची माहिती दिली. पक्षातील वरिष्ठांच्या माहितीवरून पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली. दाखल तक्रारीवरून विष्णूनगर पोलीस पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही तपासले असता त्यात दोन जण हा प्रकार करत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी तात्काळ तपासाची चक्रे फिरवत मगरे याला शनिवारी सकाळी अटक केली. तर सायंकाळी कोकाटे याला अटक करण्यात आली आहे.विशेष म्हणजे हे दोघे शिंदे समर्थक असल्याचे सांगण्यात येते.

**डोंबिवली ।** भारतीय जनता पक्षाच्या वतीने डोंबिवली पश्चिमेतील कोपर परिसरातील खासगी, सार्वजनिक संरक्षित भिंतीवर येत्या लोकसभा निवडणुकीचा भाग म्हणून पक्षाचे निवडणूक चिन्ह कमळ काढत जाहिराती करण्यात आल्या आहेत. या कमळ चिन्हावर काही लोकांनी काळे फासल्याची घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. याप्रकरणी दिलेल्या तक्रारी नुसार विष्णूनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी शिंदे गटाचे समर्थक सम्राट मगरे, विशाल कोकाटे यांना अटक केली आहे.या प्रकरणात सम्राट हा मुख्य आरोपी असून तो एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेशी संबंधित असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. यामुळे महायुतीमधील भाजप-शिवसेना या मित्र पक्षातील वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

# मुंब्र्यात क्लस्टर सर्वेक्षणाला प्रारंभ; नागरिकांना मिळणार अधिकृत घर

**मुंब्रा :** मुंब्रा येथे समूह विकास योजना राबवण्यासाठी २०१४ पासून आपण सातत्याने प्रयत्न करत होतो. आता योजनेला मंजुरी मिळाली आहे. योजनेसाठी सर्वेक्षण सुरूआहे. मुंब्रा येथे यूआरपी ३८ अंतर्गत सर्वेक्षण सुरू झाले आहे. दोन टप्प्यात याचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. योजनेसाठी सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील प्रक्रिया करण्यात येईल व ज्या नागरिकांचे १०० चौरस फुटाचे घर आहे. त्यांना ३२५ चौरस फुटांचे अधिकृत घर देण्यात येईल, अशी माहिती ज्येष्ठ माजी नगरसेवक राजन किणे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या योजनेमुळे अनधिकृत इमारतीतील रहिवाशांना अधिकृत घर मिळेल, असा विश्वास किणे यांनी व्यक्त केला.



यावेळी माजी नगरसेविका अनिता किणे, मोरेश्वर किणे, मुंब्रा शहराध्यक्ष मुबीन सुर्वे, एफ.एम. इलियास आदी पदाधिकारी उपस्थित होते. विरोधक या योजनेसंदर्भात अफवा पसरवण्याची शक्यता आहे, मात्र नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, कोणत्याही माहितीसाठी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन किणे यांनी केले. जी धार्मिक स्थळे असतील तीसुद्धा क्लस्टरमध्ये पुन्हा मिळतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ही योजना राबवण्यासाठी विशेष परिश्रम घेतल्याची माहिती किणे यांनी दिली.

आयुक्त अभिजीत बांगर यांचे त्यांनी आभार मानले. राष्ट्रवादीने विकास नव्हे तर भकास केला, अशी टीका त्यांनी केली. राष्ट्रवादीने समूह विकासाला अडथळे निर्माण करण्याचा नेहमी प्रयत्न केल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

# मनसेचा धडक मोर्चा

**कल्याण :** दूषित पाणीपुरवठा,अधिकृत नळ जोडण्या, उद्यानांची दुरवस्था अशा विविध नागरी समस्यांबाबत मनसेने कल्याण -डोंबिवली महापालिका मुख्यालयावर धडक मोर्चा काढला. यावेळी मनसेच्या मंडळाने मागण्यांचे निवेदन पालिका आयुक्तांना देण्यात आले. येत्या १५ दिवसांत जर पालिकेने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी केली नाही तर प्रशासनाला मनसे सुतासारखे सरळ करेल असा इशारा मनसेचे जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर यांनी दिला.मनसे जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर, शहराध्यक्ष माजी आमदार प्रकाश भोईर, महिला शहर अध्यक्ष कस्तुरी देसाई यांच्या नेतृत्वाखाली मनसेचे शेकडो पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी पालिकेवर मोर्चा काढला.